
# जाऊ देवाचिया गावा

हरे कृष्ण संस्थेची मराठी पत्रिका

वर्ष ८, अंक ९५ - डिसेंबर २००९

कृष्णकृपाश्रीमूर्ती भक्तिसिद्धांत सरस्वती प्रभुपाद यांच्या मार्गदर्शनाखाली हरे कृष्ण संस्थेचे संस्थापकाचार्य कृष्णकृपाश्रीमूर्ती ए.सी. भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद यांनी ही पत्रिका BACK TO GODHEAD या नावाने १९४४ साली स्थापन केली. 'जाऊ देवाचिया गावा' हे अखिल मानवतेचे आध्यात्मिकीकरण करण्याचे सांस्कृतिक साधन आहे. आमचे उद्देश :

१. सर्वांना भ्रमापासून सत्य अर्थात, जडापासून चेतन, क्षणभंगुरतेपासून नित्यता वेगळे पाहण्यास मदत करणे.
२. भौतिकवादाचे दोष उघडे करणे.
३. वैदिक संस्कृतीनुसार आध्यात्मिक जीवनाकरिता प्रशिक्षण देणे.
४. वैदिक संस्कृतीचे जतन आणि प्रचार करणे.
५. भगवान श्रीचैतन्य महाप्रभूंच्या शिकवणीनुसार भगवंतांच्या दिव्य नामाचे संकीर्तन करणे.
६. पूर्ण पुरुषोत्तम भगवान श्रीकृष्णांचे स्मरण करण्यात आणि त्यांची सेवा करण्यात अखिल जीवमात्रांना मदत करणे.


**बी.बी.टी. विश्वस्त** प.पू. गोपालकृष्ण गोस्वामी महाराज, प.पू. जयाद्वैत स्वामी महाराज • **संपादकीय मंडळ प्रमुख** प.पू. लोकनाथ स्वामी महाराज • **संपादक** श्यामानंद दास • **उप संपादक** मदन गोपाल दास • **सहाय्यक** रघुपती दास, रोहिणीकुमार दास, वृंदावन किशोर दास • **व्यवस्थापन** सनतकुमार दास, गोविंद दास • **प्रकाशक** युधिष्ठीर दास • **मांडणी आणि कला** सुंदररूप दास • **उत्पादन** सच्चिदानंद दास • **कोषाध्यक्ष** सहदेव दास • **वितरण व्यवस्थापक** पांडुरंग दास • **वितरण कार्यालय** मंजरी देवी दासी • **सल्लागार मंडळ** वृंदावन आनंद दास, अक्रुर दास, राधेश्याम दास, देवामृत दास.



©२००९,भक्तिवेदान्त बुक ट्रस्ट इंटरनॅशनल, भक्तिवेदांत बुक ट्रस्टच्या वतीने उज्जवल जाजू द्वारा मुद्रित आणि प्रकाशित.


**मुद्रण : मॅग्ना ग्राफिक्स** लि.,१०१ सी अॅन्ड डी, गव्हर्नमैन्ट इन्डस्ट्रीयल इस्टेट, कांदीवळी, मुंबई -६७. येथे तर प्रकाशन ह्न ३३, जानकी कुटीर, जुहू, मुंबई ह्न ४९ येथे करण्यात आले. संपादक : श्यामानंद दास, श्री श्री राधा गोपीनाथ मंदिर, चौपाटी, मुंबई ह्न ७



श्रील प्रभुपाद प्रवचन

**२**
### मृत्यूची तयारी
श्रील प्रभुपाद समजावून सांगतात की मृत्यूची तयारी करणे, हेच मनुष्य जीवनाचे उद्दिष्ट आहे.

**७**
### ठिबक सिंचन
हरिनामाद्वारे सतत सिंचन केल्यास आपली भक्तिलता उत्तमप्रकारे वाढून तिला कृष्णप्रेमाची फळे लागतील.

**८**
### अग्नी - एक ध्यान
अग्नीशी नेहमी संबंध येत असला तरी कदाचित्च आपण अग्नीकडे श्रीकृष्णांच्या संबंधात पाहिले असेल.

**१६**
### योग्यवेळी भक्तीचा उदय
सद्य जीवनात भक्ती प्राप्त होण्यामागील विविध कारणांचे विवरण

**२०**
### आज की ताजा खबर!
दररोज बदलणाऱ्या वृत्तपत्रांतील बातम्यांमध्ये न रमता भगवद्लीलांच्या दिव्य आणि शाश्वत कथनांमध्ये रममाण झाले पाहिजे.

**२२**
### निसर्गावर आधारित जीवन
औद्योगिक क्रांतीद्वारे नव्हे तर निसर्गावर आधारित जीवन व्यतीत केल्यानेच मनुष्य सुखासमाधानात राहू शकतो.

**वैष्णव दिनदर्शिका** ७
डिसेंबर २००९

**श्रील प्रभुपाद उवाच** १४
भौतिक प्रगती : काळाचा अपव्यय

**संपादकीय** ३२
महाभारत ह्न घरात असावे की नाही!

**२६**
### (डि)व्हाईन फ्लू
एक अशा प्रकारचा रोग ज्यामुळे मनुष्याची भवरोगातून मुक्तता होते.

**२८**
### सुखाच्या शोधात
कितीही भौतिक उपाययोजना आखल्या तरी आध्यात्मिक ज्ञानाविना आपण या जगात सुखी होऊ शकत नाही.



जाऊ देवाचिया गावा ही पत्रिका वर्षातून बारा वेळा प्रकाशित केली जाते. सदस्यता शुल्क: वार्षिक रु. १५०.००, द्वैवार्षिक : रु. ३००.०० पंचवार्षिक : रु. ७००.००. आपण कोणत्याही महिन्यापासून सदस्य होऊ शकता. मनीऑर्डर Jau Devachiya Gava या नावाने करावी. ती पाठविताना किंवा संपादकाबरोबर पत्रव्यवहार करताना आपले संपूर्ण नाव आणि पत्ता पिनकोडसहित सुवाच्च अक्षरात लिहावा. पत्ता बदलला असल्यास त्वरित संपर्क साधावा. चेकने रक्कम पाठविणे असल्यास मुंबई बाहेरच्या चेकचे रु १०.०० अधिक द्यावे लागतील. चेक जाऊ देवाचिया गावा या नावाने लिहावा. वरील सर्व कारणांकरिता आमचा पत्ता पुढीलप्रमाणे आहे: 'जाऊ देवाचिया गावा' ३०२, अमृत इंडस्ट्रियल एस्टेट, ३रा मजला, पश्चिम एक्सप्रेस हाइवे, मीरा रोड (पूर्व), ४०११०४, दूरध्वनी:-०२२ ३२५५६७०१.


**संपर्कासाठी पत्ता :** नंददुलाल दास,जाऊ देवाचिया गावा,श्री श्री राधा गोपीनाथ मंदिर, ७, के.एम.मुन्शी मार्ग, गिरगाव चौपाटी, मुंबई -७. e-mail : JauDevachiyaGava@pamho.net


हरे कृष्ण संस्थेतील भक्तांची नावे ही, भगवंत किंवा भगवद्भक्तांच्या नावापुढे दास (पुरुषांना) आणि देवी दासी (स्त्रियांना) असे जोडून दिली जातात. उदाहरणार्थ: कृष्ण दास, राम दास, मध्वाचार्य दास, राधा देवी दासी, यमुना देवी दासी.

# मृत्यूची तयारी

भगवान श्रीकृष्णांविषयी केले गेलेले श्रवण आणि कीर्तन आपल्याला मृत्यूच्या भयापासून मुक्त करते.


आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघाचे संस्थापकाचार्य

**कृष्णकृपाश्रीमूर्ती ए. सी. भक्तिवेदांत स्वामी श्रील प्रभुपाद**

यांनी १७ एप्रिल, १९७३ रोजी लॉस एंजिलिस् (अमेरिका) येथे दिलेले प्रवचन.

आज रात्री मी परीक्षित महाराजांविषयी बोलणार आहे. आपल्याला माहीत आहे की त्यांच्याकडे मृत्यूपूर्वी केवळ सात दिवस उरले होते. ते युवावस्थेत होते; परंतु, एका ब्राह्मण पुत्राने त्यांना शाप दिला की सात दिवसात त्यांचा मृत्यू होईल.


वैदिक संस्कृतीनुसार व्यक्तीने मृत्यूपूर्वीच भगवद्धामी परतण्याची तयारी केली पाहिजे. आधुनिक युगातील लोकांना माहीत देखील नाही की मृत्यूनंतर त्यांना काय होणार आहे. परंतु, आमची वैदिक संस्कृती इतकी आंधळी नाही. वैदिक संस्कृती मानवी जीवनाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी आहे. उद्देश्यविहीन जीवन हे पशू जीवन आहे. पशू हे प्रकृतीच्या नियमांद्वारे नियंत्रीत असतात; परंतु, आपणास प्राप्त झालेले मानवी जीवन हे जबाबदारीचे जीवन आहे.



भौतिक जीवनाचे चक्र तसेच चालू ठेवणे अथवा ते थांबविणे, याची निवड आपल्या हातात आहे. पुन्हा पुन्हा जन्म-मृत्यूच्या चक्रात अडकून राहणे अत्यंत भयावह आहे. आपण हे ध्यानात ठेवले पाहिजे की पुढील जन्मी आपणास एका वृक्षाचे शरीर देखील प्राप्त होऊ शकते. पहा तर, हे वृक्ष अमेरिकेमध्ये किती कठीण जीवन जगत आहेत – जोरदार हिमवर्षावाखाली ते असहाय्यपणे उभे आहेत. आपल्याकडे निवासस्थान असल्याने आपण स्वत:चे रक्षण करू शकता. परंतु, ते तर एका ठिकाणाहून फूटभर देखील हलू शकत नाहीत. आपल्याला असे जीवन मिळू शकते. प्रकृतीच्या या नियमांतून वाचण्यासाठी आपण अत्यंत सावधान असले पाहिजे. चौऱ्यांशी लक्ष योनींमधील कोणत्याही योनीत जन्म मिळू शकतो. त्यामुळे मनुष्य जीवन हे जबाबदारीचे जीवन आहे.

*लब्ध्वा सुदुर्लभं इदं बहु सम्भवान्ते* । यातील *बहु सम्भवान्ते* चा अर्थ

आहे 'अनेकानेक जन्मांनंतर'. *लब्धा सुदुर्लभम्. सु* चा अर्थ आहे 'अत्यंत'आणि *दुर्लभम्* चा अर्थ आहे 'अत्यंत कठोर प्रयत्नांनंतर प्राप्त झालेले'. ''अनेकानेक जन्मांनंतर व्यक्तीला मनुष्य जन्म प्राप्त होतो आणि या जीवनात तो महान सफलता प्राप्त करू शकतो.'' ही महान सफलता प्राप्त करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला परिपूर्णपणे प्रयत्न केला पाहिजे. कोणीही असा विचार करू नये, ''आता तर मी तरुण आहे, त्यामुळे जीवनाची मजा लुटावी.'' आपल्या अमेरिका देशात ही सुविधा प्राप्त करणे अत्यंत सोपे आहे. शाळा, महाविद्यालये तसेच समाजामध्ये युवक-युवतींना भौतिक इंद्रियतृप्ती करण्याच्या अनेक सुविधा उपलब्ध आहेत. भौतिक जीवनाचा अर्थ आहे मैथुन जीवन. परंतु, श्रीमद्‌भागवतात सांगितले आहे की मनुष्याने त्वरित सर्वोच्च सफलता प्राप्त करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपल्या जीवनाला व्यर्थ गोष्टींमागे धावण्यात वाया घालवू नये. भौतिक भोगविलासात मग्न झाल्यास आपल्याला पुन्हा या भौतिक जगात जन्म घ्यावा लागेल आणि कदाचित् हा पुढील जन्म मनुष्य योनीत नसेल. भागवतात सांगितले आहे की जोपर्यंत आपण आपले मन आणि चेतना शुद्ध करीत नाही तोपर्यंत पुन्हा पुन्हा भौतिक शरीर धारण करावे लागेल आणि पुन्हा त्याच त्याच दु:खमय परिस्थितींतून जावे लागेल. हा जीवनाकडे पाहण्याचा निराशावादी दृष्टीकोण नाही. ही वास्तविकता आहे.



*सात दिवसात मृत्यू होणार हे समजताच परीक्षित महाराजांनी शुकदेव गोस्वामींचा आश्रय घेतला आणि त्यांच्याकडून श्रीमद्‌भागवताचे श्रवण केले.*

## सफलतेचा मानदंड

श्रील सनातन गोस्वामी आणि श्रील रूप गोस्वामी मंत्रीपदावर कार्यरत होते. ते अत्यंत धनवान होते आणि त्यांचे राहणीमान अत्यंत उच्चकोटीचे होते. परंतु, हे सर्व त्यांना संतुष्ट करू शकले नाही. त्यांनी आपल्या उच्च पदाचा त्याग केला आणि जीवनाचे अंतिम उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी भगवान श्रीचैतन्य महाप्रभूंचे अनुयायी बनले. अशी अनेक उदाहरणे आहेत. श्रीचैतन्य महाप्रभूंचे सर्व शिष्य हे समाजातील अत्यंत महत्त्वपूर्ण लोक होते. उदाहरणार्थ, श्रीचैतन्य महाप्रभूंचे सचिव, स्वरूप दामोदर हे अत्यंत विद्वान वेदांतवादी होते. आणि षड्‌गोस्वामींपैकी सनातन गोस्वामी, रूप गोस्वामी, रघुनाथ गोस्वामी समाजातील अत्यंत धनवान आणि प्रतिष्ठित व्यक्ती होते. रघुनाथ दास गोस्वामी एका फार मोठ्या जमीनदाराचे पुत्र होते. पाचशे वर्षांपूर्वी त्यांच्या पित्याचे वार्षिक उत्पन्न बारा लाख रुपये इतके होते. ते आपले पिता आणि काकांचे एकमेव उत्तराधिकारी होते आणि तरीही त्यांच्यामध्ये या संपत्तीचा भोग करण्याची कोणतीच अभिलाषा नव्हती. ते श्रीचैतन्य महाप्रभूंचे शिष्य बनले आणि रघुनाथ दास गोस्वामी या नावाने ओळखले जाऊ लागले. गोपाल भट्ट गोस्वामी आणि जीव गोस्वामी देखील समाजातील अत्यंत महत्त्वपूर्ण लोकांपैकी एक होते. आपले जीवन परिपूर्ण बनविण्यासाठी ते श्रीचैतन्य महाप्रभूंचे अनुयायी बनले. आपण आपले स्वत:चे जीवन परिपूर्ण बनविण्यासाठी अशा महान भक्तांच्या जीवनातून आदर्श घ्यावा.

सफलता म्हणजे भौतिक चेतनेला परिवर्तीत करून कृष्णभावनाभावित बनणे. हीच मनुष्य जीवनाची सफलता आहे. येथे जमलेले आपण सर्व युवक-युवती अत्यंत

भाग्यशाली आहात. कारण, आपण अशा ठिकाणी आला आहात जेथे तुम्ही कृष्णभावनाभावित होऊ शकता. मनुष्य जीवन हे सर्वश्रेष्ठ वरदान आहे. त्यामुळे असे मनुष्य जीवन प्राप्त झाले असता आपण ते भौतिक इंद्रियभोगामागे व्यर्थ न दवडता त्वरित कृष्णभावनाभावित होण्यासाठी वापरले पाहिजे.

**मनुष्य जीवन भौतिक इंद्रियभोगामागे व्यर्थ न दवडता त्वरित कृष्णभावनाभावित होण्यासाठी वापरले पाहिजे.**

परीक्षित महाराजांना एक गोष्ट नक्की माहीत होती की त्यांना सात दिवसांनंतर मृत्यू येणार आहे; परंतु, आपणास हे माहीत नाही की सात दिवस वा सात मिनिटेदेखील आपण जीवंत राहू शकू. हे जीवन कोणत्याही क्षणी समाप्त होऊ शकते. या जीवनाची कोणीच शाश्वती देऊ शकत नाही. त्यामुळे वृद्धावस्थेत कृष्णभावनेचा स्वीकार करण्याचा विचार करू नका. त्यामुळे आत्ता या क्षणीच कृष्णभावनेचा स्वीकार करा. परीक्षित महाराजांच्या उदाहरणावरून आपण हे पाहू शकतो की जीवनाच्या कोणत्याही स्थितीत मृत्यू येऊ शकतो. त्यामुळे मृत्यू येण्याआधीच कृष्णभावनाभावित होणे अनिवार्य आहे. सतत श्रीकृष्णांचे स्मरण केले पाहिजे. यालाच कृष्णभावना म्हणतात.

## परीक्षित महाराजांचे चरित्र

जीवनाच्या अंतिम क्षणी परीक्षित महाराजांना शुकदेव गोस्वामींसारख्या शुद्ध भक्ताचा संग प्राप्त झाला. परीक्षित महाराजांनी त्यांना विचारले, ''महाशय, सात दिवसात मला मृत्यू येणार आहे, तेव्हा अशावेळी माझ्या जीवनाचे कर्तव्य काय आहे? कृपया याचे मला वर्णन करा.'' परीक्षित महाराजांचा जन्म महाराज पांडूच्या परिवारात झाला होता. ते अर्जुनाचे पौत्र (नातू) होते. अर्जुनाचा पुत्र, अभिमन्यूचा कुरुक्षेत्रावरील युद्धात मृत्यू झाला. त्यावेळी ते सोळा वर्षांचे होते आणि ते विवाहीत होते. त्यांचा मृत्यू झाला तेव्हा त्यांची पत्नी गर्भवती होती. परीक्षित महाराजांचा जन्म त्यांच्या पित्याच्या मृत्यूनंतर झाल्याने त्यांनी आपल्या पित्याला कधीच पाहिले नव्हते. त्यांच्या आजोबांनी त्यांचे संगोपन केले. पांडवांच्या परिवारातील सर्व मूले युद्धभूमीवर मारली गेली होती. केवळ पाच पांडव आणि त्यावेळी गर्भावस्थेत असलेले हे बालकच जीवंत राहिले होते. कौरव पक्षातील सर्व सदस्यांचा देखील या युद्धात मृत्यू झाला होता – ते फार मोठे युद्ध होते. या गर्भावस्थेतील मुलावर देखील ब्रह्मास्त्र सोडले गेले होते; परंतु, स्वत: भगवान श्रीकृष्णांनी त्याचे रक्षण केले. श्रीकृष्ण नेहमीच आपल्या भक्तांचे रक्षण करतात. भगवद्गीतेत त्यांनी तसे आश्वासन देखील दिले आहे. आईच्या गर्भातदेखील श्रीकृष्णांनी त्या मुलाचे रक्षण केले. श्रीकृष्ण त्यांचे ब्राह्मण पुत्राद्वारे दिल्या गेलेल्या शापापासून देखील रक्षण करू शकत होते; परंतु, परीक्षित महाराजांची तशी इच्छा नव्हती. त्यांनी त्या प्रसंगाला अत्यंत गंभीरतेने स्वीकारले, ''मी एका ब्राह्मणाचा अपराध केला असल्याने मला हा शाप मिळाला आहे. हे माझ्यासाठी चांगले आहे.'' पहा, ते किती महान होते! त्या शापाला प्रत्युत्तर देण्याची क्षमता असून देखील त्यांनी तो शाप स्वीकारला आणि ते मृत्यूची तयारी करण्यासाठी गंगातीरावर गेले. लहानपणीपासून ते भगवंतांचे महान भक्त होते. बालपणी ते राधा-कृष्णांच्या विग्रहांबरोबर खेळायचे, जसे हा मुलगा (एका मुलाकडे संकेत करून) द्वारकाधीश भगवान जगन्नाथांच्या विग्रहाबरोबर खेळत आहे. मातेच्या गर्भातच परीक्षितांना श्रीकृष्णांचे दर्शन घडले होते. जन्मानंतर ते त्या व्यक्तीचा शोध घेत होते ज्याने त्यांचे गर्भामध्ये ब्रह्मास्त्रापासून रक्षण केले होते. म्हणून त्यांचे नाव परीक्षित अर्थात, 'परीक्षण करणारा' असे पडले. आपल्या आजुबाजूला लोकांना पाहात ते विचार करायचे, ''श्रीकृष्णांचे ते रूप कुठे आहे?'' म्हणून त्यांचे नाव 'परीक्षित' पडले.

अशाच प्रकारे माझ्या वडलांनी देखील बालपणी मला राधा-कृष्णांचे विग्रह दिले. त्यामुळे बालपणापासून मला विग्रहांची सेवा करण्याची संधी प्राप्त झाली. परीक्षित महाराजांनी शुकदेव गोस्वामींना श्रीकृष्णांविषयी कथन करण्याची विनंती केली. हे ऐकून शुकदेव गोस्वामी अत्यधिक प्रसन्न झाले, कारण ते अशा वेळी परीक्षितांना श्रीकृष्णांविषयी श्रवण करण्याचाच सल्ला देणार होते. शुकदेव गोस्वामी म्हणाले –

*वरीयानेष ते प्रश्न: कृतो लोकहितं नृप।*
*आत्मवित्सम्मत: पुंसां श्रोतव्यादिषु य: पर: ।।*

''हे राजन! आपण अत्यंत भाग्यशाली आहात. श्रीकृष्णांविषयी आपण विचारलेल्या प्रश्नांचे स्वागत आहे. आपण श्रीकृष्णांविषयी जिज्ञासा करीत आहात आणि हे प्रश्न अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. हे प्रश्न केवळ आपल्याच नव्हे तर संपूर्ण मानव समाजाच्या कल्याणाकरिता आहेत. आपल्या प्रश्नांचे मी उत्तर देईन.'' श्रीकृष्णांविषयी प्रश्न-उत्तर इतके महत्त्वपूर्ण आहेत की भविष्यात या प्रश्न-उत्तरांची चर्चा संपूर्ण मानव समाजाद्वारा केली जाईल.'' खरेतर, आता हे खरोखरच घडत आहे. आपण याच घटनेची चर्चा करीत आहोत.

## योग्य प्रश्न

पूर्ण जगत प्रश्न-उत्तरांनी भरलेले आहे. परंतु, श्रीकृष्णांविषयी या प्रश्न-उत्तरांची स्तुती केवळ आत्मसाक्षात्कारी लोकांद्वारेच केली जाते. भौतिक शरीराशी आसक्त असलेले

लोक यामध्ये रुची घेत नाहीत. दोन प्रकारचे लोक आहेत. समाजातील ९९.९% लोक देहात्मबुद्धीत गर्क आहेत आणि उर्वरित अत्यंत अल्पसंख्यक हे कृष्णभावनेत प्रगती करण्याचा प्रयत्न करीत आहेत. ऐकण्यासाठी तसे अनेक विषय आहेत; परंतु, श्रीकृष्णांविषयी श्रवण अत्यंत आकर्षक आहे. *पर:* चा अर्थ आहे 'विशेष' आणि *श्रोतव्य* चा अर्थ आहे 'श्रवणीय'. श्रीकृष्णांविषयी श्रवण आकर्षक का आहे? शुकदेव गोस्वामी सांगतात –

*श्रोतव्यादीनि राजेन्द्र नृणां सन्ति सहस्रश: ।*
*अपश्यतामात्मतत्त्वं गृहेषु गृहमेधिनाम् ।।*

तर ऐकण्यासाठी अनेक विषय आहेत. उदाहरणार्थ, वृत्तपत्रात अनेक प्रकारच्या बातम्या असतात. परंतु, त्या कोणासाठी आहेत? साधारण लोकांसाठी. त्या आमच्यासाठी नाहीत. वृत्तपत्रात कोणती बातमी आली आहे, याच्याशी आमचे कोणतेच देणे-घेणे नाही. दररोज सकाळी सामान्यपणे सर्वचजण वृत्तपत्र वाचण्यासाठी आतुर असतात; परंतु, हरे कृष्ण संस्थेतील भक्तांना त्यामध्ये मूळीच रुची नाही. हे तथ्य शुकदेव गोस्वामींद्वारा याठिकाणी सांगण्यात आले आहे. ते राजाला संबोधित करीत आहेत, ''हे सम्राट! ऐकण्यासाठी तसे अनेक विषय आहेत.'' परंतु, कोणत्या प्रकारच्या लोकांसाठी? जे मूर्ख आहेत आणि ज्यांना आत्मसाक्षात्कारामध्ये कोणतीच रुची नाही, त्यांच्यासाठी अनेक प्रकारचे लौकिक विषय आहेत. त्यांना अंध म्हटले गेले आहे, कारण डोळे असूनही ते जीवनाच्या मूल्यांचे विश्लेषण करीत नाहीत. म्हणून शुकदेव गोस्वामी त्यांच्या डोळ्यांची तुलना मोरपंखावरील डोळ्याशी करतात. ते मूळीच आत्मनिरीक्षण करीत नाहीत. यास्तव वैदिक संस्कृती सांगते की आपण शास्त्र-चक्षुंद्वारा पाहिले पाहिजे, या भौतिक चक्षुंद्वारा नव्हे. हे डोळे अनेक प्रकारे बद्ध आहेत त्यामुळे त्यावर विश्वास ठेऊ नये. गुरू आणि शास्त्रांच्या दृष्टीतून पाहा. हीच पूर्णता आहे.

## दोन प्रकारचे लोक

पारिवारिक जीवनामध्ये दोन प्रकारचे लोक असतात – गृहमेधी आणि गृहस्थ. या दोघांमध्ये जमीन-आसमानचा फरक आहे. गृहमेधी म्हणजे असे लोक जे केवळ कौटुंबिक कार्यकलापांमध्ये मग्न असतात आणि गृहस्थ म्हणजे असे लोक जे कौटुंबिक जबाबदारी पार पाडता पाडता कृष्णभावनेला आपल्या जीवनाचे प्रमूख केंद्र बनवितात. गृहमेधी केवळ आपले घर, पत्नी, पुत्र यांची देखरेख करण्यात व्यस्त असतात. हाच त्यांच्या जीवनाचा उद्देश असतो. त्यांच्यासाठी इतर कोणतेही काम नसते. ते जीवनाच्या मूल्यांप्रती अंध असतात आणि याउलट, गृहस्थ व्यक्ती जीवनातील मूल्यांची काटेकोरपणे जोपासना करतो. अशा गृहस्थ व्यक्तीचा एकच उद्देश असतो की कशा प्रकारे तो कृष्णभावनेत सफलता प्राप्त करू शकेल. आत्मसाक्षात्काराप्रती अंध असलेल्यांसाठी वृत्तपत्रातील हजारो बातम्या आहेत. साधारण लोकांनी घराला सजविणे, यालाच जीवनाचे उद्देश मानले आहे – दिवसभर काबाडकष्ट करा, चांगली वस्त्रे परिधान करा, चांगले घर बांधा... बस्स् इतकेच. यालाच ते जीवनाची सफलता मानतात. त्यांच्या जीवनशैलीचे वर्णन करताना शुकदेव गोस्वामी म्हणतात, ''रात्री ते आपला वेळ केवळ संभोग आणि झोपण्यामध्ये व्यतीत करतात.'' आणि, दिवसा ते काय करतात? दिवसा ते केवळ 'पैसा! पैसा! पैसा!' करीत धावत असतात आणि पैसे मिळाल्यावर त्वरित तो खर्च करण्याची योजना बनवितात. कुटुंबियांसाठी ते हजारो रुपये खर्च करतील; परंतु, कृष्णभावनेच्या प्रचारासाठी त्यांच्याकडे एक रुपया देखील मागितला तर ते म्हणतात, ''माझ्याकडे काहीच नाही.'' ते नृत्यशाळांमध्ये जातील, स्त्रीयांबरोबर अवैध संबंध ठेवतील. या सर्व गोष्टी काही नवीन नाहीत. अगदी प्राचीन काळापासून लोक या गोष्टींचे शिकार बनले आहेत. हा मानवाचा स्वभावच आहे. तरीही ते विचार करतात की ते आधुनिक युगात वावरत आहेत. आधुनिक युग ते कशाला म्हणतात? जुनी दारू नवीन बाटलीत भरल्याने कोणताच फरक पडत नाही. त्यामुळे प्रश्न उठतो की, ते अशा प्रकारे आपले मौल्यवान मनुष्य जन्म व्यर्थ का घालवित आहेत?

## डोळे असूनही अंध

भागवतात सांगितले आहे –

*देहापत्यकलत्रादिष्वात्मसैन्येष्वसत्स्वपि ।*
*तेषां प्रमत्तो निधनं पश्यन्नपि न पश्यति ।।*

*देह* म्हणजे 'शरीर'. *अपत्य* म्हणजे 'मुले-बाळे'. *कलत्र* म्हणजे 'पत्नी'. सुरक्षेची सर्व मजबूत साधने उपलब्ध असताना ज्याप्रमाणे एखादे राष्ट्र स्वत:ला सुरक्षित समजते, त्याचप्रमाणे साधारण लोक विचार करतात की त्यांच्याकडे सुदृढ शरीर, चांगली मुले, चांगला बँक बॅलेंस, जमीन-जुमला असेल तर या गोष्टी त्यांना सुरक्षा प्रदान करतील. त्याला वाटते, ''माझ्याकडे सुंदर पत्नी, चांगली मुले, बँकेत भरपूर पैसे, जमीन-जुमला असताना कृष्णभावनेमागे वेळ का बरे खर्ची घालू? मी पूर्णपणे सुरक्षित आहे.'' परंतु, वास्तवत: असे लोक अंध आहेत. कसे काय? तर ते विचार करीत आहेत की या भौतिक वस्तू त्याला चिरकाळ सुरक्षा प्रदान करतील. *प्रमत्त* म्हणजे 'वेडा'. त्यांचा असा विचार करणे वेडेपणाचे

**गृहमेधी केवळ आपले घर, पत्नी, पुत्र यांची देखरेख करण्यात व्यस्त असतात. हाच त्यांच्या जीवनाचा उद्देश असतो.**

लक्षण आहे. *तेषां प्रमत्तो निधनं पश्यन्नपि न पश्यति.* यद्यपि, ते डोळ्यांसमोर इतरांना नष्ट होताना पाहात आहेत, तरीदेखील वेडेपणामुळे ते त्यांच्याकडील सर्व वस्तूंचा भावी विनाश पाहू शकत नाहीत. ''माझा वडलांचा मृत्यू झाला तसा एक दिवस माझा देखील मृत्यू होईल...माझ्या मुलांचा देखील मृत्यू होईल.'' आपण कुटुंबाचे रक्षण करण्यासाठी इतके चिंतातूर का आहात? एक दिवस सगळ्यांचाच मृत्यू होणार आहे. ते दररोज पाहू शकतात की ज्या वस्तूंसाठी ते इतके झटत आहेत त्या एके दिवशी नष्ट होतील, कारण भूतकाळात या वस्तू नष्ट झाल्या आहेत. इतिहासात अनेक सम्राट आले आणि गेले. मुगल साम्राज्य, रोम साम्राज्य, ब्रिटीश साम्राज्य – काळाच्या ओघात सर्वजण नष्ट झाले. भारतीय साम्राज्य देखील संपुष्टात आले, जेथे पूर्वी परीक्षित महाराज संपूर्ण विश्वाचे सम्राट होते. ते पाहात आहेत की जेव्हा मृत्यूचे बोलावणे येते तेव्हा भौतिक वस्तू कोणत्याही प्रकारे आपल्या सुरक्षेसाठी उपयोगी येत नाहीत.

म्हणून परीक्षित महाराज मृत्यूची तयारी करीत होते. त्यांचे सैनिक, पुत्र, पत्नी, राष्ट्र, संपत्ती त्यांचे रक्षण करू शकत नव्हते. मृत्यूवेळी कोणतीही भौतिक वस्तू आपली मदत करू शकत नाही. उदाहरणार्थ, आकाशातून विमानाद्वारे प्रवास करताना आपणास स्वत:चे रक्षण स्वत:च करावे लागते. विमान खाली कोसळू लागल्यास इतर यात्रेकरू अथवा दुसरे विमान आपले रक्षण करू शकत नाही. तुम्ही खाली कोसळणारच. त्याचप्रमाणे मृत्यूवेळी कोणीच आपली मदत करू शकत नाही. आपण असे म्हणू शकत नाही, ''माझे साम्राज्य, माझे कुटूंब, माझी संपत्ती...माझे रक्षण करेल.'' नाही, ते कदापि शक्य नाही.

म्हणून शुकदेव गोस्वामी सरतेशेवटी म्हणतात,

*तस्माद्भारत सर्वात्मा भगवानीश्वरो हरि: ।*
*श्रोतव्य कीर्तितव्यश्च स्मर्तव्यश्चेच्छताभयम् ।।*

शुकदेव गोस्वामी सांगत आहेत की आपण जर आपले ध्यान केवळ वृत्तपत्रांतील बातम्या अथवा या जगातील इतर माहिती प्राप्त करण्यासाठी लावाल, तर अशा प्रकारचे श्रवण आपल्याला कोणतीच सुरक्षा प्रदान करू शकणार नाही. तेव्हा आपण काय केले पाहिजे – तर, भगवान श्रीहरींविषयी श्रवण केले पाहिजे. भगवान श्रीहरी हे सर्व ऐश्वर्यांचे स्वामी असल्याने ते आपल्या सर्व दु:खांचे हरण करतील.

त्यामुळे लौकिक बातम्या, माहिती ऐकण्यापेक्षा आपण आपले ध्यान भगवंतांविषयी श्रवण करण्यावर केंद्रित करावे. भगवंतांविषयी श्रवण करा आणि त्याचा इतरांना प्रचार करा. श्रवण केले नाही तर प्रचार तरी कसा करू शकणार. त्यामुळे प्रथम श्रवण करा, चिंतन करा आणि नंतर या भगवद्विज्ञानाचा प्रचार करा. ऐवढेच आपण केले पाहिजे. आपल्या संपत्तीमध्ये सुरक्षेची अपेक्षा करणारे कधीच सफल होणार नाहीत. शुकदेव गोस्वामींनी परीक्षित महाराजांना सल्ला दिला, ''कृष्णभावनाभावित बनणे हेच आपल्यासाठी सर्वात महत्त्वपूर्ण कार्य आहे.'' परीक्षित महाराज मृत्यूच्या अत्यंत जवळ होते. आपणास असा सल्ला दिला गेला तर आपण त्याचे त्वरित अवलंबन करू शकणार नाही. त्याचा तुम्हाला प्रथम अभ्यास केला पाहिजे. आपण युद्धाच्या मैदानात पहिल्यांदाच उतरले असता चांगला योद्धा म्हणून स्वत:ला सिद्ध करू शकणार नाही. युद्धात जाण्यापूर्वी युद्धकौशल्याचा अभ्यास करावा लागेल. आमचे हे कृष्णभावनामृत आंदोलन लोकांना जीवनाच्या अंती मृत्यूचा सामना करण्याचे प्रशिक्षण देत आहे. तेव्हा आपण सर्वांनी त्याचा लाभ घ्यावा.

धन्यवाद, हरे कृष्ण!

## वैष्णव दिनदर्शिका

### डिसेंबर २००९ – जानेवारी २०१०

**डिसेंबर २००९**


**बुधवार २,** कात्यायनी व्रत समाप्त.
**शनिवार ५,** श्रील भक्तिसिद्धान्त सरस्वती ठाकूर तिरोभाव (दुपारपर्यंत उपवास)
**शनिवार १२,** श्रील देवानंद पंडित तिरोभाव; सफला एकादशी.
**रविवार १३,** पारणाची वेळ : ७.०४ – १०.३१
**सोमवार १४,** श्रील महेश पंडित तिरोभाव; श्रील उद्धरण दत्त तिरोभाव.
**बुधवार १६,** धनुष संक्रांती.
**गुरुवार १७,** श्रील लोचन दास ठाकूर आविर्भाव.
**शनिवार १९,** श्रील जीव गोस्वामी तिरोभाव; श्रील जगदीश पंडित तिरोभाव.
**सोमवार २८,** पुत्रदा एकादशी.
**मंगळवार २९,** पारणाची वेळ : ७.१३–९.२२
**गुरुवार ३१,** श्रीकृष्ण पुष्य अभिषेक.

**जानेवारी २०१०**

**मंगळवार ५,** श्रील रामचंद्र कविराज तिरोभाव; श्रील गोपाल भट्ट गोस्वामी आविर्भाव.
**शुक्रवार ६,** श्रील जयदेव गोस्वामी तिरोभाव. श्रील लोचनदास ठाकुर तिरोभाव.
**रविवार १०,** सत्–तिला एकादशी.
**सोमवार ११,** पारणाची वेळ : ११.०३ नंतर.

# ठिबक सिंचन

– युगावतार दास



शेतीमध्ये काही विशिष्ट फळे उगविण्यासाठी ठिबक सिंचन ही प्रक्रिया वापरली जाते. यामध्ये ज्या ठिकाणी बीज पेरले असते किंवा जेथे अंकुर फुटला असतो, त्या ठिकाणी वर एका मडक्यामध्ये पाणी ठेवलले असते. या मडक्याच्या तळाला एक छोटे छिद्र असते. या छिद्रामधून मडक्यातील पाणी थेंब-थेंब करून त्या उगविणाऱ्या अंकुरावर दिवस रात्र पडत राहते. या दिवस रात्र मिळणाऱ्या पोषणामुळे अंकुराचा वृक्ष होतो आणि मग त्या वृक्षाला फळे येतात.

श्रीचैतन्यचरितामृतामध्ये श्रीचैतन्य महाप्रभू श्रील रूप गोस्वामींना सांगतात – ''या ब्रह्मांडामध्ये भ्रमण करणाऱ्या असंख्य जीवात्म्यांमध्ये तो जीवात्मा भाग्यवान आहे ज्याला गुरुकृपेचे बीज प्राप्त आहे. या गुरुकृपेच्या बीजाला जर जीवात्म्याने हरिनामाचे पाणी दिले तर त्या बीजातून भक्तिलतेचा अंकुर फूटेल आणि एक दिवस ही भक्तिलता ब्रह्मांडाला भेदून आध्यात्मिक विश्वात जाईल जेथे तिला कृष्णप्रेमाची फळे येतील.

पण, या भक्तिलतेला दिवसातून एकदा पाणी घालून भागत नाही, तर तिला दिवस रात्र पाणी घालावे लागते.

या भक्तिलतेला जेव्हा आपण हरिनामाचे पाणी घालू तेव्हा ते ठिबक सिंचन पद्धतीने घातले पाहिजे – म्हणजे चोवीस तास. नामस्मरण म्हणजे आपल्याला वाटते की केवळ सकाळी दोन तास जप करायचा आणि दिवसभर श्रीकृष्णांना विसरायचे. नामस्मरण हे अखंडीतपणे झाले पाहिजे. अखंडीत नामस्मरण म्हणजे सर्व काम-व्यावसाय सोडून २४ तास जपमाळेवर जप करणे नव्हे. तसे करता आले तर उत्तमच! पण, घर चालविणाऱ्या गृहस्थांना आणि मंदिर चालविणाऱ्या भक्तांनाही हे तसे अशक्यच आहे. तरीही वेळ मिळताच निर्धारित १६ माळापेक्षा अधिक माळा करण्याचा प्रयत्न आपण करावा. श्रील प्रभुपादांनी कमीतकमी १६ माळा करायला सांगितले आहे. परंतु, आपण मात्र जास्तीत जास्त १६ माळा करतो.


आपल्याला व्यावसायाच्या ठिकाणी मात्र माळेवर जप करणे शक्य नसते; पण, आपण मनात श्रीकृष्णांचे स्मरण नक्कीच करू शकतो. कधी कधी आपले मन व्यावसायामध्ये खूपच व्यस्त असते किंवा व्यवसायामध्ये एकाग्रता आवश्यक असते. काही भक्तांचे असे मत आहे की जर आपण हरिनामाच्या प्रती आसक्त झालो तर हे हरिनाम कीर्तन चित्रपटाच्या पार्श्वगीताप्रमाणे मन:पटलावर सदैव चालू राहते, अगदी इतर कामात व्यस्त असलो तरी. व्यावसायाच्या ठिकाणी श्रीकृष्णांच्या नियंत्रणाची जाणीव ठेवत आपण मनाची समतोलता राखून इतरांना आपल्या व्यवहारातून कृष्णभावनेचा प्रचार करू शकतो.

अशा रीतीने आपण २४ तास श्रीकृष्णांचे स्मरण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अशा ठिबक सिंचनाने भक्तिलतेला कृष्णप्रेमाची फळे येतील.

# अग्नि - एक ध्यान

अग्नीच्या विशेष गुणधर्मांचा विचार करून आपण सर्व शक्तींचे स्रोत असणाऱ्या श्रीकृष्णांचे स्मरण करू शकतो.

– ऊर्मिला देवी दासी



क्रो एशियातील एका समुद्रकिनारी बसले असता पुन्हा पुन्हा माझ्या पायांना लाटांचा स्पर्श होत होता. सूर्याची अंतिम किरणे आकाशात लपत चालली होती. आकाश गडद निळे होत चालले होते. मी खाडीच्या दुसऱ्या बाजूस असणाऱ्या तेल शुद्धिकरण कारखान्यावरील चिमनीतून निघणाऱ्या अग्नीच्या लपेटांना पाहात होती. दिवसभर सूर्यप्रकाशामुळे न दिसणारी ही ज्योत रात्री मात्र अगदी प्रमूखतेने दिसत होती. त्या नृत्य करणाऱ्या अग्नीच्या लपेटांना पाहून माझ्या मनात विचार आला – अग्नी कसे काय सर्वांचे ध्यान आकर्षित करतो?

खरे पाहता, श्रीकृष्णांच्या अनेक शक्तींपैकी एक असणारा अग्नी आकर्षक वाटणे यात काही विशेष नाही. श्रीकृष्णांच्या नावाचा अर्थ आहे 'सर्वाकर्षक'. श्रीकृष्ण एक व्यक्ती आहेत आणि त्यांच्यापासून प्रकट होणाऱ्या सर्व शक्ती देखील त्यांच्याप्रमाणेच आकर्षक आहेत. अग्नीच्या गुणधर्मांचा विचार करून आपण श्रीकृष्णांचे स्मरण करू शकतो. आपण नेहमीच या ना त्या कारणाने अग्नीच्या संपर्कात येत असल्याने भौतिक प्रतीत होणाऱ्या परिस्थितीतदेखील आपण आध्यात्मिक चेतना विकसित करू शकतो.

सर्वप्रथम आपण अग्नीची उष्णता, नंतर अग्नीचा प्रकाश आणि त्याची सुंदरता याविषयी चर्चा करू. अग्नीच्या सुंदरतेबाबत विचार करून आपण स्वभाविकपणे श्रीकृष्णांच्या सुंदरतेचा विचार करणार आहोत. आणि, शेवटी आपण श्रीकृष्णांच्या अग्नीशी संबंधीत लीलांचे चिंतन करणार आहोत.

## उष्णता

प्राणवायूनंतर भोजन आणि पाणी यांना आपल्या सर्वाधिक महत्त्वपूर्ण शारीरिक गरजा मानल्या जातात. परंतु, आपण भोजनाशिवाय काही महिने आणि पाण्याशिवाय काही आठवडे राहू शकतो. त्यामुळे वायूनंतर सर्वाधिक आवश्यक तत्त्व आहे – उष्णता.

आपण दोन प्रकारे सूर्याकडून जीवनदायक उष्णता प्राप्त करतो. पहिली जी प्रत्यक्षपणे आपल्या त्वचेवर पडणारी आणि दुसरी अप्रत्यक्षपणे आपल्या उदरात पचनक्रियेसाठी आवश्यक असणारी. उष्ण रक्त असणाऱ्या मानवसारख्या प्राण्यांमध्ये ऐंशी टक्के भोजन आंतरिक उष्णता निर्माण करण्यासाठी उपयोगात आणले जाते. तरीदेखील आपण पाहू शकत नाही की कशा प्रकारे ही उष्णता आपल्याला आंतरिक तसेच बाह्यरूपाने शरीराला जीवंत ठेवते. तसेही उष्णतेला कोणीच पाहू शकत नाही. अशाच प्रकारे श्रीकृष्ण देखील बद्धजीवांसाठी अदृश्य बनून राहतात. ते आपले पालनपोषण करतात. आपल्या अंत:करणात तसेच चारी दिशांना उपस्थित असूनदेखील आपण त्यांना पाहू शकत नाही आणि त्यांच्यावरील निर्भरतेला पूर्णपणे विसरून जातो. एक सामान्य व्यक्ती त्यांच्याप्रती साधा आभार देखील व्यक्त करीत नाही. परंतु, जे श्रीकृष्णांना पूर्णपणे विसरलेले आहे त्यांना देखील श्रीकृष्ण सर्वकाही पुरवितात.

उष्णतेद्वारा अदृश्य राहून देखील आपल्याला जीवंत ठेवणाऱ्या वास्तवतेकडे पाहून भगवद्गीतेतील एक श्लोक आठवतो. या श्लोकात श्रीकृष्ण म्हणतात की ते माळेतील धाग्याप्रमाणे आहेत ज्याच्यावर सर्व मोती टिकलेले आहेत. आपण जाणतो की माळेमध्ये धागा असल्यामुळेच त्यावर मोती विशिष्टरीतीने टिकलेले आहेत. परंतु, तो धागा मोत्यांमध्ये लपला असल्याने आपण त्याला पाहू शकत नाही.

श्रीकृष्ण आपल्या जीवनात त्या धाग्याप्रमाणे असले तरी ते धाग्याप्रमाणे नाजूक मूळीच नाहीत. त्यांच्यापासून येणाऱ्या उष्णतेच्या शक्तीविषयी थोडा विचार करा. शरीराचे तापमान थोडे जरी वर-खाली झाले तर आपला मृत्यू होऊ शकतो, नाहीतर कोणत्यातरी भयंकर रोगाला बळी पडू शकतो. अग्नीशी संबंध असणाऱ्या लोकांनी अत्यंत सावधगिरीने राहिले पाहिजे. कडक थंडीमध्ये सर्वांना शेकोटीतील अग्नीच्या बाजूला बसायला आवडते; परंतु, त्या अग्नीच्या अतिजवळ जाणे धोकादायक ठरू शकते. याच प्रकारे जोपर्यंत आपल्या अंत:करणात भगवंतांविषयी शुद्ध प्रेम जागृत होत नाही, तोपर्यंत दूर राहून कठोरपणे नियमांचे पालन करीत आपण त्यांची सेवा करतो आणि अपराधरूपी अग्नीपासून स्वत:ला वाचविण्याचा प्रयत्न करतो.

अग्नीशामक दलातील एक अनुभवी सदस्य, मिट्च कैन लिहितात – ''अग्नी एक जीवंत वस्तू आहे – विनाशाचे जणू इंजिनच. अग्नीची प्रत्येक लपेट निराळी असते. वनातील अग्नीचा एक विशिष्ट ध्वनी आणि गंध असतो जो मी कधीच विसरू शकत नाही.'' अग्नीची विनाशकारी शक्ती प्रलयाचे स्मरण करविते. त्यावेळी आपल्या खऱ्या स्वार्थापासून विमुख झालेले बद्धजीवात्म्यांबाबत अप्रसन्न होऊन भगवंत संपूर्ण सृष्टीला अशा अग्नीद्वारे भस्मसात करतात, जिच्या समोर अनेकानेक सूर्यांची उष्णता देखील फिकी पडेल.

**श्रीकृष्ण परम कल्याणकारी आहेत आणि त्यांची प्रलयकारी अग्नीदेखील शुद्ध करणारा आहे.**

अग्नीकडे आपण 'चांगला किंवा वाईट' दृष्टीकोण ठेवला तर ती आपली चूक ठरेल. श्रीकृष्ण परम कल्याणकारी आहेत आणि त्यांची प्रलयकारी अग्नीदेखील शुद्ध करणारा आहे. अनेकदा शेतात उगविलेले अनावश्यक गवत आणि त्यांच्या बीजांना नष्ट करण्यासाठी शेतकरी शेतात आग लावतात आणि त्यामुळे

उरलेली राख जमिनीला आणखी सुपिक बनविते. वैज्ञानिक आणि डॉक्टर उष्णतेच्या विनाशकारी शक्तीच्या माध्यमातून अनेकप्रकारचे कार्य संपादन करतात. याच प्रकारे श्रीकृष्ण भगवद्‌गीतेत सांगतात की आत्मा आणि भगवंतांविषयीचे दिव्य ज्ञान समस्त अज्ञानता आणि कष्टांना जाळून भस्मसात करते. ज्याप्रकारे उच्च तापमानावर जिह्वेची उष्णता अनुभवू शकतो. अशा उष्णतेचा प्रेमाशी देखील संबंध आहे. म्हणून 'गरम मिठीत' अथवा 'थंड स्वागत' असे वाक्प्रचार प्रचलित आहेत. जेव्हा आपण सूर्य, अग्नी अथवा कारखान्यातील भट्टीतून येणाऱ्या उष्णतेचा अनुभव करतो, तेव्हा त्यामध्ये श्रीकृष्ण आणि त्यांचे प्रेम या दोहोंची अनुभूती करू शकतो.

त्याच्यामध्ये विभिन्न प्रकारचे भक्तिभाव प्रकट होऊ लागतात. आपल्या शरीरात देखील अग्नी सर्वत्र व्याप्त आहे. श्रीकृष्ण गीतेत सांगतात की ते स्वत:च हा अग्नी आहेत. हा अन्न पचविणारी अग्नी पोटात गेलेल्या अन्नपदार्थांना पचवून त्यापासून निर्मित उर्जेद्वारे शरीराच्या विभिन्न अंगांचे पोषण करतो. असे करीत असताना तो अवांछित तत्त्वांना अर्थपूर्ण तत्त्वांपासून विलग करतो.



आयुर्वेदानुसार पाचक अग्नीचा अंतिम परिणाम तेज आणि बल प्रदान करणे आहे. अशाच प्रकारे श्रीकृष्णांप्रती भक्तिमय सेवेद्वारा होणाऱ्या शुद्धिकरणाच्या अंतिम अवस्थेत जीवात्म्याला असे आध्यात्मिक बल प्राप्त होते ज्याद्वारे त्याचे सर्व अनर्थ - जसे शरीर आणि मनाशी तादात्म्य करणे - पूर्णपणे नष्ट होतात.

मोठ्या अग्नीवर भोजन बनविल्यास ते बाहेर करपून जाते आणि आतून कच्चे राहते. उचित तापमानावर धैर्याने भोजन बनविल्यास वास्तविक स्वाद प्राप्त होतो. त्याचप्रमाणे अपेक्षित फल प्राप्त करण्यासाठी आपण दक्ष मार्गदर्शनाखाली श्रवण, कीर्तन आणि सेवा करीत कृष्णभक्तीचे पालन केले पाहिजे. अधीर भक्तियोगी सुरुवातीला प्रचंड उत्साह दाखवितो; परंतु, नंतर त्याचा उत्साह निघून गेल्याने तो निराश बनतो आणि भक्तिमार्गावर तो अपयशी ठरतो. याउलट, जे उत्साह, धैर्याने भक्तियोगाचे पालन करतात त्यांचे हळूहळू हृदय परिवर्तन होऊन कृष्णप्रेमाच्या दिव्यानंदाचे ते आस्वादन करतात.

भाजलेली बीजे अंकुरित होण्याची क्षमता गमावून बसतात, त्याचप्रमाणे श्रीकृष्णांबरोबर प्रेममय भक्तीचा संबंध कर्म आणि जन्म-मृत्यूच्या चक्रात गुरफटवून टाकणाऱ्या सर्व भौतिक इच्छांना निस्तेज करून टाकतो.

हे बीज तेव्हाच जळून खाक होतात जेव्हा भक्त भगवंतांची सेवा करण्याचे दृढ व्रत घेतो. दीक्षेवेळी यज्ञातील आगीत आहुती दिली जाते. अग्नीला श्रीकृष्णांची जिह्वा मानले गेले आहे - ते अन्नादी घटक स्वीकारून यज्ञ संपादन करणाऱ्या व्यक्तीला शुद्ध बनवितात. अशा प्रकारे यज्ञाग्नीमध्ये आपण श्रीकृष्णांच्या

जीवन आणि प्रेम यांचा नेहमी भोजनाशी संबंध येतो. उष्णतेमुळे भाजीपाल्यांमध्ये रंग आणि रस येतो. हा भाजीपाला शिजविण्यासाठी जेव्हा भांड्यात ठेवला जातो तेव्हा हीच उष्णता या भाजीपाल्यात नरम आणि स्वादपूर्ण बनविते. याच प्रकारे श्रीकृष्ण शुष्क ज्ञानी लोकांच्या हृदयात प्रेमाची लहर प्रवाहीत करून त्यांच्या पाषाण हृदयाला लोण्याप्रमाणे मृदू बनवितात. उष्णता ज्याप्रमाणे आपल्या भोजनात लपलेल्या विभिन्न स्वादांना बाहेर आणते, त्याचप्रमाणे जेव्हा एखादा जीवात्मा श्रीकृष्णांची सेवा करू लागतो तेव्हा

उष्णता भोजनामध्ये असणाऱ्या अणूंचा परस्परांवर आघात करवून त्याला शिजविते. उष्णता भाजी, अन्न इत्यादींचे स्वरूप नष्ट करून एक नवीन स्वरूप प्रदान करते. उष्णता वायूमध्ये तरंग निर्माण करते, ज्यामुळे पक्षी उंचावर उडाण भरू शकतात. सूर्याची उष्णता समुद्राच्या पाण्याचे वाफेत रूपांतर करून ढगांद्वारे पाऊसाच्या रूपात सर्वत्र शुद्ध, मधूर पाण्याचे वितरण करते. उष्णतेद्वारे वस्तूंना हलविणे, सरकविणे किंवा वाहून नेणे आपल्याला स्मरण करून देते की श्रीकृष्णांबरोबरील संबंध हा जड नसून कार्यशील आहे. इतकेच काय, तर त्यांच्या संपर्कात आलेल्या जड वस्तूदेखील चेतन बनतात - उदाहरणार्थ, त्यांच्या बासरीचा मधूर ध्वनी ऐकून पर्वत पिघळू लागतात. श्रीकृष्ण त्यांच्याशी संपर्कात आलेल्या सर्वांच्या हृदय आणि मनाला विर्दिण करतात.

## प्रकाश

उष्णतेप्रमाणे प्रकाशाचा देखील जीवन आणि प्रेमाशी घनिष्ट संबंध आहे. म्हणून आपण म्हणतो, ''अमुक व्यक्तीचे नेत्र आपल्या प्रियजनांना पाहताच चमकून उठले.' प्रकाश जीवनाचे प्रतीक आहे. अशा प्रकारे प्रकाश आपल्याला स्मरण करवितो की श्रीकृष्णच सर्व जीवांचे जीवन आहे आणि सर्वांचे सुहृद मित्र आहेत.

दीप, मेणबत्त्या, रंग-बिरंगे बल्ब, अतिषबाजी इत्यादी आपल्या उत्सवांचे अभिन्न अंग आहेत. अशा प्रकाशाला पाहून आपण ध्यान करू शकतो की कशा प्रकारे आध्यात्मिक जगातील प्रत्येक दिवस म्हणजे उत्सव आहे. रसराज श्रीकृष्ण दररोज नित्यनवीन प्रकारे आनंदाचे आस्वादन करतात.

आपण एखाद्या स्नेहसम्मेलनात जावे अथवा घरात प्रवेश करावा, प्रकाश नेहमीच आपले स्वागत करतो. घरामध्ये प्रकाश असेल तर आपण जाणू शकतो की घरामध्ये आपले स्वागत करण्यासाठी कोणीतरी आहे. ज्योतीद्वारा इतरांचा सम्मान करणे एक प्राचीन परंपरा आहे. म्हणून मंदिरांमध्ये दिवा दाखवून भगवंतांची आरती केली जाते. एका प्रसिद्ध भजनात म्हटल्याप्रमाणे भक्त आपल्या प्रेमरूपी दिपकाद्वारे भगवान श्रीकृष्णांची आरती करतात. श्रीकृष्ण देखील अशा भक्तांना आपल्या नित्य प्रकाशमय धामात परतण्यासाठी आमंत्रित करतात.

श्रीकृष्णांचे आमंत्रण आपल्या अंत:करणांना प्रकाशित करते, ज्यामुळे अज्ञान किंवा मायाशक्तीला दूर सारून आपण त्यांची सेवा करण्याची निवड करू शकू. यालाच 'ज्ञानाचा प्रकाश' म्हटले जाते. अगदी सामान्य दृष्टीकोणातून पाहिले तरी साधे भौतिक ज्ञान प्राप्त करण्यासाठी देखील प्रकाशावर निर्भर राहावे लागते. जेव्हा कधी प्रकाशाच्या संपर्कात येतो, तेव्हा आपण स्मरण करू शकतो की कशा प्रकारे श्रीकृष्ण सर्व प्रकारच्या ज्ञानाचे स्रोत आहे, मग ते आध्यात्मिक असो वा भौतिक.

शास्त्र नेहमी ज्ञानाची तुलना सूर्यप्रकाशाशी करते. सूर्यप्रकाशाला श्रीकृष्णांचे अस्त्र





*बाणासुराबरोबरील युद्धात शिवांचे अग्नेय आणि श्रीकृष्णांच्या अतिशीत बाणांमध्ये टक्कर झाली.*

असणाऱ्या सुदर्शनासमान मानले जाते, कारण त्याचा अर्थ आहे 'सुमंगल दृष्टी'. सूर्यप्रकाश अथवा सुदर्शन भगवंतांचे नेत्र आहे. आपल्या डोळ्यांना कार्य करण्यासाठी प्रकाशाची आवश्यकता असते; परंतु, श्रीकृष्णांचे नेत्र प्रकाश उत्पन्न करतात. अनेकदा आपण डोळ्यांद्वारा खूणवून संवाद साधतो आणि सुदर्शनाला 'वाणीचा स्वामी' देखील म्हटले जाते, कारण जेव्हा आपण ज्ञानाद्वारे प्रकाशित होतो तेव्हा आपल्या मुखातून केवळ सत्यच बाहेर पडते.

प्रकाश न केवळ वाणी आणि मनाचे पोषण करतो, तर शरीराचे देखील. वृक्ष-वेली सूर्यप्रकाशापासून उर्जा प्राप्त करतात आणि हीच उर्जा पृथ्वीवरील इतर जीवांचे पोषण करते. जर का आपण ध्यान करू की कशा प्रकारे आपले भोजन सूर्याची शक्ती आहे आणि कशा प्रकारे तो सूर्यप्रकाश श्रीकृष्णच आहेत, तेव्हा अत्यंत सहजपणे प्रत्येक घास खाताना आपण श्रीकृष्णांच्या सहवासाचा अनुभव करू शकतो.

एका बाजूला सूर्याचा प्रकाश अत्यंत तीव्र असतो तर दुसरीकडे चंद्राचा प्रकाश अत्यंत शीतल असतो. तो ताजेपणा प्रदान करून दिवसभराचा थकवा दूर करतो. श्रीकृष्णांचा आश्रय घेण्याची तुलना नेहमी चंद्राच्या प्रकाशाखाली येण्याशी केली जाते. याबरोबर चंद्र सामान्य लोकांमध्ये प्रेमभाव जागृत करतो; परंतु, त्याला पाहून आध्यात्मिक साधक पवित्र गोपींबरोबर श्रीकृष्णांच्या पावन रासलीलेचे स्मरण करतो.

## अग्नी आणि श्रीकृष्णांची सुंदरता

श्रीकृष्ण सांगतात की तेच अग्नीचे तेज आहेत. अग्नी सुंदर, भव्य आहे. खळखळणाऱ्या झऱ्यातील तरंगांवर चमकणारी सूर्यकिरणे, होळीतील अग्नीच्या झळी, आकाशातील चमकणाऱ्या ताऱ्यांचे समुह, अतिषबाजीतील विविध प्रकाशमय फटाके, निऑन साईन, गंगेच्या पाण्यावर तरंगणारे दिवे – निश्चितच् अग्नी अतिशय सुंदर आहे.

अग्नी केवळ सुंदरच नाही, तर या जगातील कोणतीही गोष्ट दिसते, कारण अग्नीचा प्रकाश तिला प्रकाशित करतो. प्रकाशाविना 'सुंदर'

शब्दाला कोणताच अर्थ नाही. अग्नीविना रंग अस्तित्वात येणार नाहीत. समस्त सुंदरता आणि चमक अग्नीवर निर्भर असेल तर आपण कल्पना करू शकतो की परम भगवान किती सुंदर असतील, जे समस्त अग्नी, उष्णता आणि प्रकाशाचे स्रोत आहेत. त्यांचे स्वरूप किती भव्य आणि प्रकाशमय असेल!

अगदी वैदिक शास्त्रांमध्ये भगवंतांच्या आध्यात्मिक, शाश्वत, नवनवायमान रूपाला इतके प्रकाशमय तसेच सुंदर असल्याचे सांगितले आहे की त्याची आपण भौतिक इंद्रियांद्वारे कल्पना देखील करू शकणार नाही. श्रीकृष्णांचे वस्त्र वितळलेल्या सोन्याप्रमाणे चमकदार आहेत आणि त्यांच्या चरणकमळांवरील नख इतके दैदिप्यमान आहेत की जेव्हा ते आपल्या कोमल चरणांना पादुकांवर स्थापित करतात तेव्हा असे वाटते जणू विभिन्न रंगांचे रत्न प्रकट होत आहेत.

### श्रीकृष्णांद्वारा अग्नीपान

आपल्या शाश्वत धामाचे स्वरूप आणि तेथील लीलांना प्रदर्शित करण्यासाठी श्रीकृष्ण पाच हजार वर्षांपूर्वी भूतलावर प्रकट झाले. छोट्या ग्वालबालाच्या रूपात लीला करीत असताना त्यांनी आपले प्रिय पशू आणि मित्रांचे रक्षण करण्यासाठी दोन वेळा विशाल दावाग्नीला गिळून टाकले. पहिल्या लीलेत अनेक व्रजवासी यमुनातिरी विश्राम करीत होते तेव्हा अचानक तेथे आग लागली. परंतु, श्रीकृष्णांनी अगदी सहजतेने तो अग्नी पिऊन टाकला.

दुसऱ्यावेळी श्रीकृष्ण आपल्या मित्रांबरोबर यमुनेच्या पैलतिरी आपल्या गाईंना चरण्यासाठी घेऊन गेले होते. खेळण्यात व्यस्त असलेल्या मूलांना समजले नाही की हिरव्या गवताच्या शोधात गाई त्यांच्यापासून फार दूर गेल्या आहेत. खूप प्रयत्नांनंतरही ते त्यांना शोधू शकले नाहीत.

अंतत: ते गवतावरील गाईंच्या ठशांचा मागोवा घेत पुढे जाऊ लागले. तोपर्यंत गाई खूप दूर गेल्या होत्या आणि वनातील दावाग्नीमध्ये फसल्या होत्या. मूले त्यांना वाचविण्यासाठी पुढे सरसावले; परंतु, अग्नी इतक्या जोराने पसरत होती की ते काहीच करू शकले नाहीत. शेवटी भयभीत होऊन ते सर्व रडू लागले. श्रीकृष्णांनी प्रत्येक गाईचे नाव उच्चारत त्यांना हाक मारली आणि पशूंनी देखील आपल्या आवाजात त्यांना उत्तर दिले. अचानक त्या अग्नीने पशूंसह ग्वालबालकांना देखील घेरले. बालकांनी श्रीकृष्णांकडे पाहात रक्षणासाठी याचना केली. प्रेमपूर्वक दृष्टी टाकून श्रीकृष्णांनी त्यांना निर्भय राहण्याचे आश्वासन दिले. त्यांनी मित्रांना डोळे बंद करण्यास सांगितले. त्या दिवशी त्यांना अग्नीची तहान लागली होती, म्हणून त्यांनी त्या विशाल अग्नीला असे पिऊन टाकले जणूकाही एखादा तहानलेला व्यक्ती शीतपेय पिऊन टाकतो. हळूहळू बालक तसेच पशूंनी आपले डोळे उघडले. हे पाहून ते आश्चर्यचकीत झाले की सभोवतालचा दावाग्नी तर नाहीसा झालाच होता आणि ते आता पुन्हा यमुना नदीच्या तटावर पोहोचले होते, जेथे अग्नीमुळे तप्त झाल्यानंतर ते यमुनेचे शीतल जल पिऊ शकत होते.

अग्नीच्या संबंधात श्रीकृष्णांच्या इतर लीला देखील आहेत. एकदा बाणासुराबरोबरील युद्धात त्यांनी शिवांच्या तळपत्या आग्नेय असुराचा वध करण्यासाठी आपल्या अतिशीत अस्त्राला प्रतिहल्ला करण्यास सांगितले होते. आणि, जेव्हा श्रीकृष्णांनी भगवद्गीता सांगताना आपले विश्वरूप दाखविले तेव्हा त्यांच्या मूखातून अग्नीज्वाला निघत होत्या.

अग्नी आणि श्रीकृष्णांवर अशा प्रकारे ध्यान करताना मी पाहिले की सूर्य क्षितीजावर लपत चालला आहे. खोली अंधाराने भरू लागली. सूर्याची ती शेवटची किरणे देखील विद्युत प्रकाशाला पराजित करणारी होती. माझ्या संगणकातून देखील प्रकाश किरण निघत होते आणि गरम खाल्लेल्या भोजनामुळे शरीरात उष्णतेचा अनुभव करीत होते. पाठीमागे भगवंतांच्या देवघरात दिवा जळत होता. अग्नी कोणत्या ना कोणत्या प्रकारे नेहमीच आपल्याबरोबर राहतो. जेव्हा आपण श्रीकृष्णांना अग्नीरूपी त्यांच्या शक्तीच्या माध्यमातून शोधण्याचा प्रयत्न करतो तेव्हा ते हे पाहून प्रसन्न होतात की आपणास त्यांच्याशी संबंध प्रस्थापित करावयाचा आहे.

''हे भगवन्, खरेतर आपणच पृथ्वी, जल, अग्नी, वायू आणि आकाश आहात.आपण इंद्रियांचे विषयवस्तू, प्राणवायू, पाच इंद्रिये, मन, चेतना आणि मिथ्या अहंकार आहात. शब्द अथवा मनाद्वारे व्यक्त कोणतेही भौतिक तत्त्व किंवा इतर कोणतीही वस्तू आपल्याहून भिन्न नाही आहे.'' (श्रीमद्भागवत ७.९.४८)


*उर्मिला देवी दासी श्रील प्रभुपादांची शिष्या आहे आणि लहान मुलांच्या शिक्षणाविषयी 'वैकुंठ चिल्ड्रन' नामक पुस्तक देखील लिहिले आहे.*

**अग्नी केवळ सुंदरच नाही, तर या जगातील कोणतीही गोष्ट दिसते, कारण अग्नीचा प्रकाश तिला प्रकाशित करतो.**

**हरे कृष्ण हरे कृष्ण**
**कृष्ण कृष्ण हरे हरे ।**
**हरे राम हरे राम**
**राम राम हरे हरे ।।**

# भौतिक प्रगती : काळाचा अपव्यय

खालील वार्तालाप ए. सी. भक्तिवेदांत स्वामी श्रील प्रभुपाद आणि त्यांच्या काही शिष्यांमध्ये लॉस एंजिलिस येथे प्रभात भ्रमणावेळी पार पडला.



**शिष्य :** श्रील प्रभुपाद, आध्यात्मिक जगतात प्रवेश करण्यासाठी पात्रता कोणती?

**श्रील प्रभुपाद :** यासाठी प्रथम आपण जाणले पाहिजे की, हे भौतिक जगत दु:खालय आहे. मगच, आपण आध्यात्मिक जगतात प्रवेश करू शकू. ''हे भौतिक जगत फार छान आहे,'' असे वाटत असल्यास आपल्याला या भौतिक जगातच खितपत पडून रहावे लागेल.

**शिष्य :** काल प्रवचनात आपण महाराणी कुंतीचे उदाहरण दिले, जेथे ती भगवंतांकडे प्रार्थना करते, ''माझ्या जीवनात पुन्हा पुन्हा संकटे येऊ देत, जेणेकरून हे भौतिक जगत किती दु:खदायक आहे, हे जाणल्याने मी सतत आपले स्मरण करू शकेन.''

**श्रील प्रभुपाद :** होय, ''हे भौतिक जगातील अस्तित्व काहीच कामाचे नाही,'' हे जाणणे हीच बुद्धिमत्ता आहे. नाहीतर, ''हे भौतिक जग नेहमीच क्लेशदायक नसते, तर काहीवेळा ते फारच छान असते'' असा विचार करणे, हे अज्ञान आहे.

**शिष्य :** आम्हाला अनेकदा असे लोक भेटतात, ज्यांचे मत आहे की – या जगात जर दु:ख नसते, तर आपल्याला सुख काय हे कसे समजले असते? त्यामुळे दु:ख हे काही वाईट नाही.

**श्रील प्रभुपाद :** त्यांचा हा न्याय, पाण्यात बुडविण्याची शिक्षा दिलेल्या गुन्हेगाराप्रमाणे आहे. पूर्वी शासक गुन्हेगाराला पाण्यात बुडवीत आणि तो घुसमटू लागताच त्याला पुन्हा बाहेर काढीत. बाहेर काढल्यावर या गुन्हेगाराला वाटत असे, ''वा! हे जग किती छान आहे.'' असा तो विचार करीत असतानाच त्याला पुन्हा पाण्यात बुडविले जायचे. त्यामुळे या भौतिक जगातील सुख आणि दु:ख हे त्या गुन्हेगारांना पाण्यात बुडवून बाहेर काढण्यासारखे आहे. पाण्यातून बाहेर काढताच त्यांना वाटते, ''वा! या जगात किती सुख आहे!'' पण, या मूर्खांना हे समजत नाही की, पुन्हा त्यांना पाण्यात बुडविले जाईल. त्यामुळे जोपर्यंत आपल्याला या भौतिक जगातील दयनीय

अवस्थेची जाणीव होत नाही, तोपर्यंत आपण आध्यात्मिक जगतात प्रवेश करण्यास पात्र ठरू शकणार नाही. या भौतिक जगाविषयी आपल्या मनात घृणा निर्माण झाली पाहिजे. पण, येथे थोडी जरी आसक्ती ठेवली, ''कधी कधी हे भौतिक जगत किती छान वाटते!'' तर आपल्याला या भौतिक जगातच खितपत पडावे लागेल.

**शिष्य :** भौतिक जगाविषयी थोडीशीही आसक्ती ठेवणाऱ्या भक्ताच्या जीवनातील सर्व काही भगवान श्रीकृष्ण हिरावून नेतात. हे खरे आहे का?

**श्रील प्रभुपाद :** ती श्रीकृष्णांची विशेष कृपा आहे. श्रीकृष्ण जेव्हा पाहतात की, त्यांचा भक्त अजूनही भौतिक जगावर आसक्त आहे, तेव्हा ते विचार करतात, ''हा मूर्ख मला प्राप्त करण्याची इच्छा करतो आणि त्याबरोबर या भौतिक जगाचा उपभोग देखील घेऊ इच्छतो. तेव्हा आता मी त्याच्याकडील सर्व काही हिरावून नेईन, जेणेकरून तो माझ्या व्यतिरिक्त इतर कोठेही आश्रय घेणार नाही.'' श्रीकृष्णांनी माझ्याबाबतीतही असेच केले. मला याचा प्रत्यक्ष अनुभव आहे. मला संन्यास घ्यायचा नव्हता. मी उद्योगधंदा करून कुटुंबभरण करण्याचा विचार करीत होतो. परंतु, श्रीकृष्णांनी माझा उद्योग बुडवून टाकला आणि शेवटी मला संन्यास घेण्यास भाग पाडले.

**शिष्य :** श्रील प्रभुपाद, श्रीकृष्णच मायाशक्तीस जीवात्म्याला त्रिताप देण्यास सांगतात का, जेणेकरून तो त्यांच्या चरणी शरण जाईल?

**श्रील प्रभुपाद :** होय. आपल्याला लाथा, बुक्क्या घालणे हेच मायाशक्तीचे, भौतिक प्रकृतीचे कार्य आहे. मूर्खपणे आपण मात्र विचार करतो, ''या लाथा किती आनंददायक आहेत.'' हा आपल्याला झालेला भवरोग आहे. आपण सदैव त्रितापांद्वारे त्रस्त असतो ह्न १) आधिदैविक : दैवी शक्तींद्वारे सोसावे लागणारे त्रास (पूर, दुष्काळ इ.) २) आध्यात्मिक ताप : स्वत:चे मन आणि शरीर यांमुळे होणारे त्रास ३)आधिभौतिक ताप : इतर जीवांपासून होणारे त्रास. तर अशाप्रकारे प्रत्येक क्षणी यांपैकी कोणत्यातरी तापाने आपण त्रस्त असतोच. तरीदेखील मूर्खपणे आपण विचार करतो की, हे भौतिक जगत फार छान आहे आणि येथे अधिक सुधारणा केल्यास आपण आणखी सुखी होऊ. हा मूर्खपणा आहे. आपली या त्रितापांतून कधीच मुक्तता होणार नाही. तेव्हा ही सुधारणा अथवा प्रगती काय कामाची?

उदाहरणार्थ, आज शास्त्रज्ञ शेती उत्पादनात प्रगती करण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण, ही प्रगती किती काळ टिकणार? जर, पाऊसच पडला नाही, तर त्यांच्या या प्रगतीचा काय उपयोग? पाऊस पाडणे, हे काही त्यांच्या हातात नाही. हा आधिदैविक ताप आहे. पाऊस पडणे हे देवतांच्या प्रसन्नतेवर अवलंबून असते. देवतांनी विचार केला तर ते पाऊस पाडणे पूर्णपणे थांबवू शकतात. त्यामुळे तुमची ही प्रगती काय कामाची?

श्रीकृष्ण सांगतात की, भौतिक जगत हे जीवात्म्याला केवळ दु:ख देण्यासाठीच बनविले आहे. तेव्हा तुम्ही यात सुधारणा कशी काय घडवून आणू शकता? शास्त्रज्ञ म्हणतात, ''हो, आम्ही प्रगती करीत आहोत. भविष्यात आम्ही असे काही तंत्रज्ञान काढू की, ज्यामुळे मनुष्य चिरकाळ जगू शकेल, त्याला कधीच मृत्यू येणार नाही.'' हा मूर्खपणा आहे. हा केवळ मायेचा खेळ आहे. अशक्यप्राय गोष्टी साध्य करण्याच्या मागे लागलेला मनुष्य मूर्ख असतो. त्याची बुद्धी ही एखाद्या गाढवाच्या बुद्धीप्रमाणे असते. मालक गाढवाच्या पाठीवर बसतो आणि त्याच्या डोळ्यापुढे एक गवताची पेंडी धरतो. हे पाहून गाढव विचार करते, ''आणखी दोन पावले पुढे गेल्यास मला हे गवत मिळेल.'' त्याला इतकी साधी गोष्ट देखील समजत नाही की, हे गवत त्याला कधीच मिळणार नाही, कारण तो जसा पुढे जाईल तसे गवताची पेंडीदेखील पुढे जातच राहील.

या शास्त्रज्ञांची अवस्थादेखील अशीच आहे. त्यांची तथाकथित 'प्रगती' काही कामाची नाही, हे ते पाहू शकत नाहीत. उदाहरणार्थ, थोड्याच अवधीत शेकडो मैल प्रवास करता येण्यासाठी आता त्यांनी विमाने निर्माण केली आहेत. ही चांगली गोष्ट आहे खरी; पण विमानातून प्रवास करणे फारच धोक्याचे असते. विमानांचे अनेक अपघात घडतात. त्यामुळे शास्त्रज्ञांसमोर आता दुसरी समस्या उभी आहे की, या अपघातातून प्रवाशांचे कसे संरक्षण करता येईल? तर, अशा संशोधनाला 'प्रगती' म्हणता येईल का? तुमची ही प्रगती म्हणजे एकाच वेळी दोनशे लोकांना मृत्यूच्या खाईत टाकणे होय. काय अघोरी आधुनिक संस्कृती आहे ही!

**शिष्य :** पण, एखादा म्हणेल, ''तुम्ही याला अघोरी समाज का म्हणत आहात? मग, तुम्ही अशा समाजात का राहता? शहरातील विमाने, मोटार गाड्यांचा वापर करण्याऐवजी तुम्ही खेड्यात जाऊन का राहात नाही?''

**श्रील प्रभुपाद :** कृष्णभावनेच्या अभावापायी लोक दु:ख भोगत आहेत. त्यामुळे त्यांना कृष्णभावना प्रदान करण्यासाठी आम्ही येथे आलो आहोत. भौतिक जगातील हेच आमचे एकमेव उद्दिष्ट आहे. नाहीतर येथे राहण्याची आम्हाला मुळीच इच्छा नाही. आम्ही काही सामाजिक किंवा राजनैतिक कार्यकर्ते नाही; आम्ही श्रीकृष्णांचे सेवक, त्यांचे कार्यकर्ते आहोत. आम्ही लोकांना सांगतो, ''तुम्ही कृष्णभावनाभावित व्हा म्हणजे तुमची सर्व प्रकारच्या समस्यांतून सुटका होईल.'' तर कृष्णभावनेचा प्रचार करणे, तसेच कृष्णभावनाभावित होण्यासाठी त्यांना सुविधा पुरविणे, हेच आमचे एकमेव कार्य आहे. तरीदेखील ते या भवौषधीचा (कृष्ण भक्तीचा) स्वीकार करीत नसतील, तर आम्ही काय करू शकतो? ते असेच या भौतिक जगात दु:ख भोगत पडून राहतील. ते मूर्ख आहेत, त्यांना वाटते की, 'आधुनिक प्रगतीद्वारे आपल्याला सुखी होता येईल.' अशांना कृष्णभावना कधीच जाणता येणार नाही.

# योग्यवेळी भक्तीचा उदय

भक्तीच्या आरंभिक वर्षात भक्त या गोष्टीपासून पूर्णपणे अजाण राहतो की भविष्यात त्याच्या जीवनात कोणते परिवर्तन घडणार आहे.

–कर्णामृत दास



माझ्या आरंभिक जीवनात मला या गोष्टीची कल्पना देखील नव्हती वयाच्या एकोणिसाव्या वर्षी माझ्या जीवनात किती आमुलाग्र बदल घडून येणार होता. माझ्या चरित्र आणि स्वभावाकडे पाहून कोणी कल्पना करू शकत नव्हता की मी एखाद्या धर्माचे पालन किंवा आध्यात्मिक जीवनात प्रगती करण्यासाठी एखाद्या आश्रमात काही वर्षे जीवन व्यतीत करेन. मी एक सामान्य अमेरिकन निवासी होतो. माझे आई–वडील एकमेकांपासून विभक्त झाले होते. अशा अवस्थेत मी मित्रांबरोब रॉक संगीतामध्ये सुख शोधण्याचा प्रयत्न करीत होतो. सॅन फ्रॅन्सिस्को येथील विद्यालयात शिक्षण घेताना मी हिप्पी आंदोलनाकडे पूर्णपणे आकर्षित झालो.



यामध्ये दुमत नाही की नाही इतर मुले देखील याच परिस्थितीतून जात होते; परंतु, ते त्या निष्कर्षाप्रत पोहोचले नव्हते ज्यापर्यंत मी पोहोचलो होतो. कदाचित ते माझ्याप्रमाणेच दु:खी होते. मात्र, सौभाग्यवश मी माझ्या समास्यांचे समाधान आध्यात्मिक जीवनात शोधू लागले. इतरजण शिक्षण, मैत्री, नोकरी, व्यापार इत्यादी गोष्टींमध्ये सुख शोधण्याचा प्रयत्न करीत होते. यापैकी काही निराश होऊन शेवटी नशिल्या पदार्थांच्या आहारी जात होते.

नक्कीच, त्या काळात जवळजवळ सर्वचजण नशेच्या आहारी गेले होते, अगदी मी देखील. यामुळे अनेकांचे जीवन उध्वस्त झाले, काहीजण या वाईट सवयीतून कसेबसे बाहेर पडून सामान्य जीवन जगू लागत, आणि अगदी थोडेच आध्यात्मिक जीवनाकडे वळत. मी यापैकी तिसऱ्या वर्गात मोडत होतो. भगवान श्रीकृष्ण गीतेत (७.३) म्हणतात, ''सहस्रावधी मनुष्यांपैकी एखादाच सिद्धी प्राप्त करण्याचा

प्रयत्न करतो आणि सिद्धी प्राप्त करणाऱ्या त्या मनुष्यांपैकी एखादाच मला तत्त्वत: जाणतो.''

## माझ्यामध्ये दडलेला भक्त

भगवद्‌गीता सांगते की आपल्या आध्यात्मिक साधनेचे परिणाम मृत्यू पश्चात देखील नष्ट होत नाहीत. पुढील जन्मात आपण त्याची फळे चाखू शकतो. माझ्यासारखा 'अभक्त' देखील कृष्णभावनेकडे आकर्षित होतो, यामागे नेमके हेच कारण असावे. माझ्या आरंभिक जीवनातील घटना तशा दु:खद प्रतीत होत असल्या तरी त्यांनी पुर्वजन्मापासून चालत आलेल्या माझ्या आध्यात्मिक जीवनाला पुढे गती दिली असावी.

भगवद्‌गीतेच्या सहाव्या अध्यातील श्लोक क्र. ३७ ते श्लोक क्र. ४५ मध्ये ते सिद्धांत दिले आहेत जे स्पष्ट करतात की, का आणि कसे एका भक्तामध्ये दडलेली आध्यात्मिक शक्ती सद्य जीवनात प्रकट होते. मनोचिकित्सक म्हणू शकतात की हे सर्व भौतिक तत्त्वांमधील परिवर्तनामुळे घडते; परंतु, त्याची मूळे ही पूर्व आध्यात्मिक जीवनात रूतलेली आहेत. श्रीकृष्ण अर्जुनाला उपदेश करताना या ज्ञानाचे वर्णन करतात, जे सामान्य रूपाने लोकांना माहीत नसते. श्रीकृष्णांद्वारा दिलेले ज्ञान माझ्या जीवनात अचानक घडलेल्या परिवर्तनाच्या रहस्याला स्पष्ट करते.

अर्जुन श्रीकृष्णांना विचारतो - ''भौतिक आसक्तीमुळे आत्मसाक्षात्कार प्राप्त करण्यात अपयशी ठरलेल्या साधकाला कोणती गती प्राप्त होते?'' अर्जुन विचार करतो की कदाचित् असा भक्त भौतिक तसेच आध्यात्मिक लाभापासून वंचित होतो का? अगदी एखादा भरकटलेला ढग आकाशात लुप्त होतो त्याप्रमाणे.

श्रीकृष्ण अर्जुनाला आश्वासन देतात की आपल्या आध्यात्मिक कार्यांचा कधीच क्षय होत नाही. उलट, जीवनाची परिपूर्णता प्राप्त होईपर्यंत जन्म-जन्मांतर ते आपल्याबरोबर राहतात. आध्यात्मिक जीवनात असफल ठरलेला व्यक्ती एकतर उच्च सुख भोगण्यासाठी स्वर्गलोकांत अथवा पृथ्वीवरील एखाद्या पुण्यवान किंवा श्रीमंत लोकांच्या घरात जन्म घेतो. असा जन्म प्राप्त झाल्यानंतर पुढे आध्यात्मिक साधना करूनही जर तो सफलता प्राप्त करीत नाही, तेव्हा पुढील जन्मी तो भक्ताच्या घरात जन्म घेतो.

गीतेतील हे श्लोक दोन महत्त्वपूर्ण मुद्द्यांना स्पष्ट करतात.

यापैकी पहिला मुद्दा असा की, आध्यात्मिक योग्यता दिसत नसताना देखील एखादा व्यक्ती भक्त कसा बनतो? यापूर्वी श्रीकृष्ण म्हणतात, ''हे सखा, चांगले कार्य करणारा व्यक्ती कधीही वाईटाने पराजित होत नाही.'' यावरून स्पष्ट होते की आध्यात्मिक जीवन जन्म-जन्मांतर चालू राहते. श्रील प्रभुपाद सांगायचे की भक्तांकडे 'आध्यात्मिक बँक खाते' असते जे एके दिवशी परिपक्व होते. त्यांची आध्यात्मिक संपत्ती काही काळ लपू शकते; परंतु, योग्यवेळी ती प्रकट होते. अगदी महान भक्ताच्या जीवनात देखील कधी कधी तो भक्तीपासून दूर गेल्याचे दिसते; परंतु, नंतर तो पुन्हा नव्या उत्साहाने, साक्षात्काराने भक्ती मार्गात स्थिर होतो. कलियुगात श्रीकृष्णांचे अवतार असणाऱ्या श्रीचैतन्य महाप्रभूंनी आपल्या सुंदरता आणि शुद्ध चरित्राद्वारे सर्वांना मोहीत केले; परंतु, युवावस्थेत त्यांनी देखील एका गर्विष्ट तार्कीकाची भूमिका निभावली होती. केवळ दीक्षा प्राप्त झाल्यानंतरच त्यांनी स्वत:ला एका आदर्श भक्ताच्या रूपात प्रकट केले.

या श्लोकांमधील दुसरा मुद्दा असा - ''तो माहीत नसताना देखील आपोआपच योगाच्या नियमांकडे आकर्षित होतो.'' याचा अर्थ असा की आपले आध्यात्मिक जीवन आपण शोध घेतला नाही तरी स्वत:हून आपल्याला शोधत येते आणि आपले जीवन पूर्णपणे बदलून टाकते. अप्रकट आध्यात्मिक जीवन एका टाईम बॉम्बप्रमाणे आहे, जो फुटण्यासाठी योग्य वेळेची वाट पाहात असतो. परंतु, जेव्हा तो फुटतो तेव्हा आपली बाह्य जीवनशैली बदलते आणि नंतर आंतरिक. असा माझा वैयक्तिक अनुभव आहे आणि याच्याशी मिळत्या-जुळत्या इतर अनेक कथा मी ऐकल्या आहेत. या जीवनात पुन: आध्यात्मिक जीवनाची प्राप्ती झाल्यावर आपण त्याचा गंभीरपणे स्वीकार करावा. असे केले तरच आपण सफलतेच्या दिशेने मार्गक्रमण करू शकतो. आपण अशा प्रकारे कार्य केले पाहिजे जणुकाही आपले आध्यात्मिक जीवन पूर्णपणे आपल्या प्रयत्नांवर आधारित आहे, मात्र त्याचवेळी आपल्याला पूर्ण विश्वास हवा की केवळ श्रीकृष्ण आणि त्यांच्या विशुद्ध भक्तांच्या कृपेनेचे आपण आध्यात्मिक जीवनात वास्तविक सफलता प्राप्त करू शकतो.

**या जीवनात पुन: आध्यात्मिक जीवनाची प्राप्ती झाल्यावर आपण त्याचा गंभीरपणे स्वीकार करावा.**

## श्रीकृष्णांना कोण प्राप्त करतो?

श्रीकृष्ण अशा व्यक्तीविषयी काय सांगतात जो भविष्यात भक्त बनणार आहे? एखादा भक्त नीच कुळात जन्मला असेल तर त्यात लज्जास्पद वाटण्यासारखे काहीच नाही. समाज अशा भक्ताला उच्च-नीच दृष्टीकोणातून पाहात असेल; परंतु, आपण भक्ताला भौतिक दृष्टीकोणातून नव्हे तर आध्यात्मिक दृष्टीकोणातून पाहिले पाहिजे. एकीकडे पाहिल्यास ही भक्तीची देखील महानता आहे की एखाद्या नीच कुळात जन्माला आलेल्या व्यक्तीलाही ती शुद्ध भक्त बनविते. दुसऱ्या बाजूने पाहता आपण जाणले पाहिजे की

भक्ताच्या जीवनात आलेले प्रसंग हे त्याच्या अर्धवट राहिलेल्या आध्यात्मिक जीवनाला पुढे प्रेरित करण्यासाठी माध्यम आहेत. अनेक लोक श्रीकृष्णांकडे मिश्रभाव घेऊन येतात – त्यांना श्रीकृष्णांच्या सेवेबरोबर आपल्या भौतिक इच्छा देखील पूर्ण करायचा असतात. एका भक्तासाठी ही परीक्षा असते की तो कशा प्रकारे या दोन गोष्टींचा मिलाप घडवून आणतो, जेणेकरून त्याचे जीवन कृष्णभावनेसाठी अनुकूल बनेल. श्रीकृष्णांचा आश्रय तसेच मृत्यूवेळेस त्यांचे राहू शकतो.

आपण एकतर वैराग्याचा मार्ग पकडून अथवा कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडत आध्यात्मिक जीवनाचे पालन करू शकतो. काही भक्त प्रथम ब्रह्मचारी आश्रमात राहिले आणि नंतर त्यांनी गृहस्थ जीवन स्वीकारले. भक्ती करण्यासाठी कोणतीही भौतिक परिस्थिती अवरोध निर्माण करू शकत नाही. कोणत्याही परिस्थितीत भक्तीचे आचरण केले जाऊ शकते. आपण केवळ श्रीकृष्ण, त्यांचे पवित्र नाम, त्यांची सेवा

**भक्ती करण्यासाठी कोणतीही भौतिक परिस्थिती अवरोध निर्माण करू शकत नाही.**

स्मरण करण्यासाठी कोणत्या प्रकारचा जन्म अथवा पार्श्वभूमी सर्वाधिक अनुकूल सिद्ध होऊ शकेल याबाबत निश्चित असे काहीच सांगता येत नाही.

आपल्यापैकी काहीजण भौतिक सफलता अथवा धार्मिक पुण्यतेमुळे श्रीकृष्णांकडे आलो आहोत. नाहीतर, काहीजण माझ्यासारखे असू शकतात, ज्याने कधीच या दोन्ही गोष्टींसाठी कधीच प्रयत्न केले नाहीत, तरीही त्याला अंततः भक्तांचा संग प्राप्त झाला. दोन्ही उदाहरणात आपल्या पूर्वजन्मांनी (किंवा, या जीवनातील भक्त बनण्यापूर्वीचे जीवन) आपल्याला या संसारातील भाग-दौडीच्या पलीकडे काहीतरी शोधण्यासाठी निर्देशित केले. गीतेच्या सातव्या अध्यायात श्रीकृष्ण सांगतात की चार प्रकारचे लोक त्यांच्याकडे येतात – दुःखी, जिज्ञासू, भौतिक लाभाची अपेक्षा करणारा आणि ज्ञानी. अशा भौतिक कारणांसाठी जरी ते श्रीकृष्णांकडे आले तरी श्रीकृष्ण त्यांना महान समजतात आणि ते जीवनाची परिपूर्णता प्राप्त करण्यास समर्थ असल्याचे सांगतात. परंतु, कृष्णभावनेचा तत्त्व व्यवस्थित समजलेला ज्ञानी व्यक्ती इतरांच्या तुलनेत आपल्या साधनेत चांगल्याप्रकारे स्थिर आणि त्यांच्या भक्तांमध्ये श्रद्धा विकसित केली पाहिजे.

निरनिराळ्या लोकांचा स्वभाव आणि पार्श्वभूमी भिन्न असल्याने आपण त्यांच्या जीवनाचे लक्ष्य आणि आदर्श यानुसार त्यांचा आदर-सम्मान केला पाहिजे. अशा प्रकारे भक्तांच्या संगतीत राहताना आपण सदैव प्राप्त करण्यास अत्यंत दुर्लभ असणाऱ्या भक्तीची स्तुती केली पाहिजे. भक्तिमार्गावर एखाद्याला संघर्ष करीत असल्याचे पाहून आपण आश्चर्यचकीत होऊ नये. प्रत्येकाला कधी ना कधी हा संघर्ष करावा लागतो, म्हणून श्रील प्रभुपादांच्या तात्पर्यातील एक परिच्छेद आपल्याला प्रोत्साहीत करतो –

*परंतु, एक सामान्य व्यक्ती भगवंतांच्या या आदेशांमध्ये दृढ विश्वास ठेवून कर्माच्या नियमांतून मुक्त होतो, अगदी जरी तो या आदेशांचे व्यवस्थित पालन करू शकला नाही तरी. कृष्णभावनेत पदार्पण केल्यावर कदाचित सुरुवातीला सर्व आदेशांचे पालन करणे शक्य होणार नाही; परंतु, भक्ताचा या आदेशांवर विश्वास असल्याने तो कोणत्याही निराशा अथवा पराजयाचा विचार न करता निष्ठापूर्वक भक्तिमय सेवेचे आचरण करीत असल्याने अंततः त्याला विशुद्ध कृष्णभक्तीचा स्तर प्राप्त होतो.*

या संदर्भात भागवताच्या अकराव्या स्कंधातील श्लोक सांगतो –

*एखादा भक्त माझ्या महिमापूर्ण कथांमध्ये श्रद्धा उत्पन्न करून साऱ्या भौतिक कार्यांबाबत निरस बनतो. परंतु, इंद्रियतृप्ती हेच सर्व दुःखांचे कारण असल्याचे जाणून देखील इंद्रियभोग सोडण्यास तो असमर्थ असेल तर त्याने सुखात राहावे आणि अत्यंत श्रद्धा तसेच पूर्ण श्रद्धेने माझी आराधना करावी. कधी कधी इंद्रियभोगामध्ये संलग्न असताना देखील माझा भक्त जाणतो की इंद्रियतृप्ती हेच सर्व दुःखांचे कारण आहे आणि तो अशा कार्यांसाठी प्रामाणिकपणे पश्चात्ताप करतो.* (श्रीमद्‌भागवत ११.२०.२७-२८)

नियमांचे पालन आणि हरे कृष्ण महामंत्राचा जप करून देखील काही भक्त इतरांच्या तुलनेत अधिक संघर्ष करताना आढळतात. या जीवनात आपले आध्यात्मिक जीवन तेथून सुरू होते जेथे आपण ते पूर्वजन्मात सोडले होते. त्यामुळे पूर्वजन्मातच ज्यांनी सर्व अनर्थांतून मुक्ती मिळविली आहे अशा भक्तांना या जीवनात तितका संघर्ष करावा लागत नाही. मात्र, अशा अनर्थांतून पूर्वी मुक्त न झालेल्या भक्ताला या जीवनात मात्र पुढे संघर्ष चालू ठेवावा लागतो. आणि, या संघर्षाचा कालावधी प्रत्येकासाठी निराळा असतो. आपण काटेकोरपणे नियमांचे पालन करण्यात असमर्थ असलो तरी आपण भक्तिमार्गाचा त्याग करू नये. ''या प्रयत्नात कोणतेही नुकसान किंवा ऱ्हास नाही आणि या मार्गातील अल्प प्रगतीनेही मनुष्याचे मोठ्या, भयंकर भयापासून संरक्षण होते.'' (भगवद्‌गीता २.४०) इतकेच काय, तर थोडीशी केलेली भक्तीदेखील आपल्याला नीच योनीत जन्म घेण्यापासून वाचवू शकते.

परंतु, भक्तिमार्गावर चालत असताना आपण आळशी बनू नये. आपली सर्व क्षमता एकवटून प्रार्थना केली पाहिजे की आपणामध्ये श्रीकृष्ण, त्यांचे भक्त आणि सर्व जीवांप्रती खरी


सेवाभावना जागृत हो. आपण आध्यात्मिक जीवनात प्रगत असाल अथवा नसाल; परंतु, श्रीकृष्ण बाराव्या अध्यायात सांगतात त्याप्रमाणे आपली सेवा भावना वृद्धिंगत अथवा विकसित करू शकतो. श्रीकृष्णांवर प्रेम करणे हा आपला उद्देश आहे आणि ते सांगतात की असे केल्याने आपण हळूहळू पूर्णतेच्या स्तरापर्यंत पोहोचू शकतो.

## काळाची मदत

कृष्णभावनेत गंभीर असलेला भक्त काळाच्या ओघात सर्व काही प्राप्त करतो. कृष्णभक्तांसाठी काळ हा भौतिकवाद्यांपेक्षा निराळ्या रीतीने कार्य करतो. श्रीकृष्ण गीतेत म्हणतात, ''मीच तो काळ आहे, ज्याद्वारे संपूर्ण जगताचा विनाश होतो'' आणि ''दमन करणाऱ्यांमध्ये मी काळ आहे.'' हे भौतिक जगत भगवान श्रीकृष्णांची शक्ती आहे आणि काळ आपल्याला भगवंतांना शरण जाण्याच्या नितांत आवश्यकतेची जाणीव करून देतो. *''सूर्य आपल्या उदय आणि अस्ताबरोबर प्रत्येकाचा जीवन कालावधी संपुष्टात आणत असतो, केवळ त्यांना सोडून जे आपला वेळ सर्वमंगलकारी भगवंतांच्या कथा श्रवणासाठी उपयोगात आणतात.''* (श्रीमद्भागवत २.३.१७) काळ सर्वप्रकारच्या भौतिक योजना आणि प्रयत्नांना नष्ट करतो; परंतु, तो एखाद्या भक्ताच्या जीवनातील आध्यात्मिक अनुभव आणि विकास अधिक श्रेष्ठ बनत जातो. सामान्य रूपात जे काही भक्ताच्या जीवनात दिसून येते, त्यापेक्षा अधिक काहीतरी घडत असते. प्रत्येक भक्ताच्या आध्यात्मिक जीवनाचा आरंभ आणि त्याचा संपूर्ण विकास होण्याचा आपला-आपला कालावधी असतो. एका साधक भक्ताच्या जीवनात अनेक पैलू कार्य करीत असतात. वर्तमान जीवनातील प्रयत्न नक्कीच महत्वपूर्ण आहेत; परंतु, पूर्वजन्मात अर्धवट राहिलेली आध्यात्मिक साधना अदृश्य रीतीने आपल्या भौतिक इच्छांबरोबर मिळून एक विशेष भूमिका निभावते. या सर्वांमागे असते ती श्रीकृष्णांची कृपापूर्ण योजना, जी अनेक कार्यांना सिद्ध करते. बरोबर याच ठिकाण श्रीकृष्णांचा हस्तक्षेप प्रवेश करतो ज्यामुळे आपण भक्तांच्या संगात येतो, आपली सुप्त श्रद्धा जागृत होते आणि आपली आध्यात्मिक प्रगती अधिक तेजस्वी बनते.

अनपेक्षित घटना आणि लोक आपल्या जीवनात येऊन त्याला नाटकीय रीतीने बदलून टाकतात. माझ्या जळून गेलेल्या जीवनाच्या राखेपासून माझा आध्यात्मिक जीवनाचा शोध सुरू झाला आणि त्याचा अंत या साक्षात्काराने झाला की श्रीकृष्णच आदीपुरुष भगवंत असून ते माझ्या जीवनाचे सर्वस्व आहेत. श्रीकृष्णांच्या पूर्ण व्यवस्थेच्या या अनुभवांवर मी अनेकदा मनन करतो आणि इतरांना देखील त्याचे कथन करतो. काही वर्षांतच माझे जीवन अशा रीतीने बदलून गेले की त्याला कोणत्याही भौतिक तर्कांने समजता येणार नाही. हा एक पुरावा आहे की कशा प्रकारे श्रीकृष्णांनी विशिष्ट परिस्थितींद्वारे मला श्रील प्रभुपाद आणि त्यांच्या भक्तांच्या संपर्कात आणले - अगदी जेव्हा मला त्याची नितांत गरज होती.

*कर्णामृत दास यानी १९७० साली श्रील प्रभुपादांकडून दीक्षा घेतली. ते आपली पत्नी, अर्चनासिद्धी देवी दासी समवेत नॉर्थ कॅरोलिना, अमेरिका येथे 'प्रभुपाद विलेज' नामक भक्त समुदायाबरोबर निवास करतात.*



# आज की ताजा खबर !

– व्रजभक्ती दास



''अहो, तुम्हाला माहित आहे काय?'' शेजारील पाटील काकूंनी जोशी वहिनींना विचारले.

''नाही हो, काय झालं?'' जोशी काकूंचे कान लगेचच टवकारले.

''अहो, सावंतांची कुसूम गल्लीतल्या पप्पू रीक्षावाल्याबरोबर पळून गेली.''त्यानंतर दोघींच्या चर्चा गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत २-३ तास रंगल्या, हे सांगायला नको.

साधारणपणे ''अहो ऐकलत का...? तुम्हाला ही बातमी समजली का...? तुला माहित आहे का...? ''इत्यादी प्रश्न ऐकल्यावर आपले कान लगेचच टवकारतात. आपल्या कानांना सदैव नवीन रोचक ऐकायला आवडते. त्यामुळे ताज्या घटना तिखट-मीठ लावून सांगणाऱ्यांचीही या जगात काही कमी नाही. वर्तमानपत्रे, प्रसारमाध्यमे आजकाल सर्व घटना अधिकाधिक रोचक, भडक आणि ज्वलंत करण्याच्या मागे आहेत असे वाटते. २४ तास बातम्या दाखविणाऱ्या टिव्हीवरील वाहिन्या एखाद्या साधारण घटनेलाही महत्वपूर्ण करण्यासाठी जीवाचा आटापिटा करत असतात. एकच क्षणचित्र उच्च स्वरात आवेशात येऊन निवेदक वारंवार दाखवितो. आबालवृद्ध प्रभातसमयी वर्तमानपत्राचे पठण करून आपापल्या आवडी आणि सवडीनुसार दिवसभर त्याची तात्पर्यासहीत पारायणे करतात. बागांमध्ये किंवा कट्ट्यावर वयस्क मंडळी 'सध्याचा काळ' आणि 'आमचा काळ' यांचा तुलनात्मक अभ्यास आणि ''आमच्यावेळी असे नव्हते हो!'' असा शेरा देत बातम्या आणि भूतकाळात गेलेल्या वर्तमानपत्राची मिमांसा करतात.

वर्तमानपत्राला सामाजिक मनाचे दर्पण असे म्हटले जाते. समाजामध्ये घडणाऱ्या घटनांचे ते बोलके चित्र आहे. दुर्दैवाने, हे चित्र आज सर्वच स्तरांवर भयावह आणि काळजी करण्यासारखे आहे. परिस्थिती सर्वच स्तरावर खालावत असताना सामान्यपणे वर्तमानपत्र वाचणे हे बहूतांशी लोकांसाठी नित्याचाच भाग झाला असतो. समाजातील वर्तमान घडामोडींचे आकलन होणे, राजकीय, व्यावसायिक, शैक्षणिक इ. अनेक बाबतीत

निश्चितच प्रसारमाध्यमे महत्वपूर्ण भूमिका निभावत आहेत; परंतु, मानवी जीवनाचे महत्व जाणून घेतल्यावर आवश्यकतेपेक्षा अधिक काळ या बातम्यांवर खर्च करणे म्हणजे जीवनातील महत्वपूर्ण गोष्टींसाठीच्या संधीला मुकल्याप्रमाणे आहे.

भागवतात शुकदेव गोस्वामी परीक्षित महाराजांना सांगतात की, वाचण्यासाठी आणि ऐकण्यासाठी या जगात हजारो गोष्टी आहेत; परंतु, त्यांचा काय उपयोग? कारण *अपश्यताम् आत्मतत्वम्* – त्यामध्ये आत्मतत्व किंवा अध्यात्मिक ज्ञानाचा अभाव आहे. असे साहित्य केवळ शरीर आणि मनाला काही काळ विरंगूळा देईल; परंतु, यामुळे जीवनाचा स्तर उंचावणार नाही.

प्रात:कालीन समय, जो चांगली कृष्णभावनाभावित कार्ये – विशेषकरून, नामस्मरण आणि गीता, भागवताच्या वाचनामध्ये घालविल्यास आपल्याला दिवसभर भगवंतांचे स्मरण करणे आणि त्यांची अनूकल सेवा करणे सुलभ होऊ शकते. तमोगुणी निद्रेतून उठून पहिला चहा घेत रजोगुणी बातम्यांचे श्रवण–किर्तन केल्यावर दिवसभर आपली चेतना विचलीत झाली नाही तरच आश्चर्य मानावे.

श्रील प्रभुपादांचे अध्यात्मिक गुरू श्रील भक्तिसिद्धांत सरस्वती ठाकूर यांनीसुद्धा एक आध्यात्मिक वृत्तपत्र सुरू केले होते. त्यावेळी त्यांना प्रश्न विचारण्यात आला की, अध्यात्मावर रोज छापण्याएवढे साहित्य तुमच्याकडे उपलब्ध आहे का? हे कसे काय शक्य आहे? अत्यंत सखोल उत्तर देत म्हणाले, ''कलकत्ता हे भारतातील एक शहर आहे. या ठिकाणी रोज घडणाऱ्या घटनांचे वर्णन करणारी किमान ७–८ वृत्तपत्रे आहेत. आणि, ही संपूर्ण भौतिक सृष्टी तर अध्यात्मिक जगाच्या १/४ च भाग आहे. आम्ही जरी प्रत्येक क्षणाला एक वृत्तपत्र काढले तरीही आमच्याकडे विषयांचा तुटवडा कधीही नसेल; परंतु, केवळ सूज्ञ वाचकांची कमतरता आहे.

भगवान श्रीकृष्णांप्रती अखंड आणि अहैतुकी भक्ती करणे, हे मनुष्य जीवनाचे सर्वोच्च ध्येय आहे. भक्तीमधील शरणागतीच्या लक्षणांपैकी दोन महत्वपूर्ण लक्षणे म्हणजे, *आनुकूलस्य संकल्प, प्रतिकूलस्य वर्जनं* – ''भक्तीसाठी अनुकूल गोष्टींचा स्वीकार करणे आणि प्रतिकूल गोष्टींचा त्याग करणे.'' साधकाने भक्तिरहीत चर्चांपासून जाणीवपूर्वक स्वत:ला दूर ठेवले पाहिजे. व्यावहारीक कार्याव्यतिरिक्त ध्येयहीन, भगवद्‌भावनाहीन वायफळ चर्चा म्हणजे *प्रजल्प* होय. भक्तांनी प्रजल्प पूर्णपणे टाळण्याचा प्रयत्न केला पाहिजे. वर्तमानपत्र, प्रसारमाध्यमे यांवरील राजकीय, गुन्हेगारी, सिनेमाक्षेत्र इ. अनेक गोष्टींवरील चर्चा आपली भक्तीमधील रुची कमी करू लागतात. अशा चर्चांमधून एकमेकांची तुलना करण्याची प्रवृत्ती वाढू लागते आणि ही वृत्ती जर भक्तिमय वातावरणात आली तर भक्तांप्रतिसुद्धा अपराध घडू शकतात. त्याचबरोबर आपण ही देखील जाणीव ठेवणे आवश्यक आहे की प्रत्येकजण आपापल्या कुवतीप्रमाणे भक्तीमध्ये प्रगती करण्यासाठी प्रयत्नशील आहे. या प्रक्रियेमध्ये कोणाकडून काही उणीवा राहू शकतात. आपण भक्तांच्या प्रामाणिक प्रयत्नांवर लक्ष केंद्रीत करणे आणि एकमेकांना कृष्णभावनेमध्ये प्रेरीत करणे गरजेचे आहे. भगवान श्रीकृष्ण गीतेत सांगतात –

*मच्चित्ता मद्गतप्राणा बोधयन्त: परस्परम् ।*
*कथयन्तश्च मां नित्यं तुष्यन्ति च रमन्ति च ।।*


''माझ्या शुद्ध भक्तांचे चित्त माझ्यामध्येच वास करीत असते, त्यांचे जीवन माझ्या सेवेमध्ये समर्पित असते आणि एकमेकांमध्ये माझ्याबद्दल चर्चा करण्यापासून आणि बोधन करण्यापासून त्यांना अत्यधिक संतोष आणि आनंद प्राप्त होतो.'' (भगवद्‌गीता १०.९)

इस्कॉनमधील एक वरीष्ठ संन्यासी एका प्रवचनात सांगत होते की, आपण श्रीकृष्ण स्मरणात इतके तल्लीन व्हावे की भगवंत लीलांचे श्रवण हे ताज्या बातमीप्रमाणे आपण दिवसभर चर्चा करीत राहिले पाहिजे. भगवंतांच्या लीलांचे, भक्तिमय तत्त्वांचे श्रवण आणि चर्चा अत्यंत गांभिर्याने आणि उल्हासाने केली पाहिजे. श्रीकृष्णांचे नामकीर्तन हे भवौषधि आह, म्हणजेच भवरोगावरील रामबाण उपाय आहे. आपण जितक्या प्रमाणात हे औषध ग्रहण करू तितक्या प्रमाणात या जगातील चर्चांमधील आपली आवड कमी होऊ लागेल. भागवतात परीक्षीत महाराज म्हणतात की, जो कोणी मनाला आणि कानांना आनंद देणाऱ्या आणि भवसागर पार करणाऱ्या उत्तमश्लोक भगवंतांच्या गुणलीलेत रममाण होत नाही, तो स्वत:चाच नाश करीत आहे.

अशारीतीने आपण नित्यनविन अशा भगवान श्रीकृष्णांच्या श्रवण–कीर्तनात रुची प्राप्त केल्यास आपले मनुष्य जीवन सफल ठरेल.

*व्रजभक्ती दास हे कोल्हापूरमधील भक्त असून ते एम्. फिल् पदवीधर आहेत. कोल्हापूरमधील युवकांमध्ये कृष्णभावनेचा प्रचार करण्यात ते सक्रीय आहेत.*


## आपले वार्षिक सदस्यत्व संपले तर नाही ना ?




काय आपण हे जाणता का, की आपले 'जाऊ देवाचिया गावा' चे वार्षिक सदस्यत्व केव्हा समाप्त होत आहे?

ज्या पाकीटातून 'जाऊ देवाचिया गावा' मासिक आपल्याकडे येते, त्याच्या मध्यभागी चिकटविलेल्या लेबलावर आपला पत्ता लिहीलेला असतो. त्या लेबलच्या ऊजव्या कोपऱ्यात सदस्यत्व समाप्त होण्याचे वर्ष आणि शेवटचा महीना छापलेला असतो. कृपया या तारखेपूर्वी आपले सदस्यत्व वाढवून घ्या, ज्यामुळे आपण आध्यात्मिकतेच्या मार्गावर अखंडपणे या अद्भुत मित्राचे मार्गदर्शन प्राप्त करत रहाल.



# निसर्गावर आधारित जीवन

औद्योगिक क्रांती होऊन अनेक शतके उलटली तरीही तिने लोकांच्या जीवनात सुख-समाधान नांदविण्याऐवजी केवळ असंतुष्टता, वैर तसेच पर्यावरणामध्ये प्रदुषण वाढविण्याची परंपराच चालू ठेवली आहे. म्हणून श्रील प्रभुपाद अशा औद्योगिक कारखान्यांपासून दूर राहून निसर्गाच्या सान्निध्यात आध्यात्मिक उद्दीष्ट डोळ्यासमोर ठेवून जीवन जगण्याचा सल्ला देतात. आपल्या गीता-भागवत ग्रंथावरील तात्पर्यात श्रील प्रभुपाद अनेक ठिकाणी याविषयी चर्चा करतात. त्यातील काही निवडक उतारे आम्ही याठिकाणी प्रस्तुत करीत आहोत.

श्रील प्रभुपाद सांगतात, ''मानवाची भरभराट निसर्गदत्त देणग्यांनी होत असते, अवाढव्य औद्योगिक उपक्रमांतून नव्हे. असे अवाढव्य औद्योगिक उपक्रम निरीश्वर संस्कृतीची निर्मिती आहे. त्यामुळे मानवी जीवनाच्या मान्यवर ध्येयांचा ऱ्हास होतो. मनुष्याची जीवनशक्ती पिळून काढणारे हे उपक्रम जसजसे वाढतील तसतसे, काही मर्यादित लोक जरी इतरांच्या पिळवणुकीने खुशालीत राहिले तरी जनसामान्य नेहमीच अशांत आणि त्रस्तच राहतील.'' (श्रीमद्‌भागवत १.८.४०)

''अशा औद्योगिक उपक्रमांमध्ये

गुंतल्यानंतर मजुरपक्षाची अत्यंत पिळवणूक होते. यंत्रसामुग्रीच्या निर्मितीतील वाढ ही लोकांना कृत्रिम वस्तूंवर आधारित जीवन जगण्यास भाग पाडते आणि त्याबरोबर हजारोंना बरोजगार बनून त्यांच्यावर उपासमारीची पाळी आणते. हा काही सुसंस्कृत, समाधानी समाजाचा स्तर नव्हे.'' (श्रीमद्‌भागवत १.९.६)

## औद्योगिक उपक्रमांचे नारकीय परिणाम

''भगवंतांच्या भक्तीमध्ये गोडी नसणारे लोक भौतिक कार्यांमध्ये गुंतून पडतात. त्यांच्यापैकी बहुतेकजण दिवसा कष्टप्रद शारीरिक कार्यांमध्ये मग्न असतात; त्यांची इंद्रिये अतिप्रचंड औद्योगिक प्रकल्पांमध्ये मोठमोठी त्रासदायक कामे करण्यात गुंतलेली असतात. अशा कारखान्यांचे मालक आपल्या औद्योगिक उत्पादनांसाठी बाजारपेठ शोधण्यात मग्न असतात आणि कामगार अवाढव्य यांत्रिक व्यवस्थांच्या उपयोगाने प्रचंड उत्पादन करण्यात मग्न असतात. 'कारखाना' हे नरकाचेच दुसरे नाव आहे. नरकतुल्य कार्यांमध्ये गुंतलेले कामगार आपल्या थकलेल्या इंद्रियांना संतुष्ट करण्यासाठी रात्रीसमयी मदिरा आणि मदिराक्षीचा (स्त्री) यांना उपभोगण्याचा प्रयत्न करतात; परंतु ते शांत, समाधानी झोपही घेऊ शकत नाहीत, कारण त्यांच्या विविध काल्पनिक योजना क्षणोक्षणी त्यांची झोपमोड करीत असतात.'' (श्रीमद्‌भागवत ३.९.१०)

''गिरण्या, कारखान्यांची वाढ याला 'उग्रकर्म' असे म्हणतात आणि असल्या कर्मांनी मानवी अंत:करणातील तरल भावना दुर्बल बनतात आणि समाज म्हणजे एक राक्षसी अंधारकोठडी बनते.''

''अंधाऱ्या खाणी, गिरण्या, कारखाने हे कर्मचारी वर्गात राक्षसी प्रवृत्ती वाढीस लावतात. हितसंबंधी लोक या कामगारांच्या जीवावर आपले वैभव वाढवितात आणि परिणामी या दोन वर्गात कितीतरी तीव्र संघर्ष होत आलेले आहेत.'' (श्रीमद्‌भागवत १.११.१२)

''यंत्रयुगामध्ये सर्वाधिक प्रमाणात दृष्टीस येणारे कारखान्यांमधील 'जीवनावश्यक वस्तूंचे' उत्पादन म्हणजे अज्ञानांधकाराचा कळसच होय. मानव समाजातील असे उद्योगधंदे हे तमोगुणीच आहेत कारण, त्यामधून जी उत्पादने होतात त्यांची वास्तविकपणे मुळीच आवश्यकता नाही. (श्रीमद्‌भागवत २.५.३०)

''जर भरपूर दूध, धान्य, फळे, कापूस, रेशीम, रत्ने हे सर्व असेल, तर लोकांना चित्रपटगृहे, वेश्यागृहे आणि कत्तलखाने लागतीलच कशाला? एका कोणातरी माणसाच्या लहरीखातर हजारो माणसे रणांगणावर अथवा नरकतुल्य कारखान्यात पाठवून या संस्कृतीने समता आणि बंधुता यांचे पाऊल कितीसे पुढे नेले आहे?'' (श्रीमद्‌भागवत १.१०.४)

''जन्म, मृत्यू, जरा, व्याधीच्या दुष्ट चक्रातून मुक्ती कशी मिळवावी, ही खरी समस्या आहे. व्यर्थ, कृत्रिम गरजांच्या पाठीमागे न लागता अशा मुक्तीची आस धरणे, हे वैदिक संस्कृतीचे मूळ तत्त्व आहे. आधुनिक भौतिकवादी समाज हा मूळ आदर्श वैदिक संस्कृतीच्या अगदी विपरित आहे. दररोज शास्त्रज्ञ अशा काही नवनवीन वस्तूंचा शोध लावत आहेत, ज्या लोकांना भौतिकवादाच्या या जंजाळात अधिकाधिक गुंतवून त्यांना पुन:पुन: जन्म-मृत्यूच्या चक्रात फेऱ्या मारण्यास भाग पाडत आहेत.'' (श्रीमद्‌भागवत ७.१४.५)

''आजकाल वैज्ञानिक सागराच्या पोटातून तेल-पेट्रोल काढण्याचा अटोकाट प्रयत्न करीत आहेत. ते भविष्यातील पेट्रोल पुरविठा प्राप्त करण्यासाठी अत्यंत प्रयत्नशिल आहेत; मात्र जन्म, मृत्यू, जरा, व्याधीच्या दुर्धर चक्रातून बाहेर पडण्यासाठी बिलकुल प्रयत्न करीत नाहीत.'' (श्रीमद्‌भागवत ४.२८.१२)

''परमेश्वराच्या अस्तित्वाची कल्पनाही नसणाऱ्या भौतिकवादी लोकांना वाटते की, आपण प्रगती करीत आहोत; परंतु भगवद्‌गीतेनुसार असेल लोक अज्ञानी आणि विचारशून्य आहेत. ते भौतिक जगताचा अधिकाधिक उपभोग घेण्याचा प्रयत्न करताता आणि म्हणून इंद्रियतृप्तीकरिता ते सदैव नवीन नवीन साधनांचा शोध घेण्यात मग्न झालेले असतात. अशा प्रकारचे भौतिक शोध करणे म्हणजे मानव समाजाची प्रगती झाली, असे मानण्यात येते. तथापि, अशा संशोधनाचा परिणाम म्हणजे लोक हे पशू आणि इतर लोकांच्या बाबतीत अधिकाधिक क्रूर आणि हिंसक होत आहेत. एकमेकांशी कसा व्यवहार करावा याची त्यांना जाण नाही. आसुरी लोक विपुल प्रमाणात पशुहिंसा करतात. अशा लोकांना जगताचे शत्रू मानले जाते कारण, शेवटी ते अशा गोष्टींचा शोध लावतील किंवा अशी गोष्ट निर्माण करतील की, त्यामुळे सर्वांचाच विनाश होईल.'' (भगवद्‌गीता १६.९)

**वैदिक अर्थशास्त्रानुसार, धान्यसाठा आणि गायींची संख्या यांच्या प्रमाणावरून मनुष्यास श्रीमंत मानले जाते.**

## निसर्गाकडून मिळणारी जीवनावश्यक साधनसामुग्री

''वैदिक अर्थशास्त्रानुसार, धान्यसाठा आणि गायींची संख्या यांच्या प्रमाणावरून मनुष्यास श्रीमंत मानले जाते. गाय आणि धान्य या केवळ दोनच गोष्टींद्वारे मानव समाज आपले प्रश्न सोडवू शकतो. आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी मानव समाजाला केवळ पुरेसे धान्य आणि गायी आवश्यक आहेत. या दोन गोष्टींखेरीज इतर सर्व गोष्टी म्हणजे मौल्यवान

मानवी जीवनाचा ऱ्हास करण्यासाठी आणि अनावश्यक वस्तूंमध्ये वेळ वाया घालविण्यासाठी मनुष्याने निर्मिलेल्या कृत्रिम गरजाच आहेत.'' (श्रीमद्‌भागवत ३.२.२९)

''भौतिक प्रकृतीचा आपल्या उच्छृंखल भोगप्रवृत्तीमुळे जितका अधिक गैरफायदा घेण्याचा आपण प्रयत्न करू तितके आपण अशा प्रयत्नांच्या प्रतिक्रियांमध्ये अधिकाधिक गुंतून पडू. जेव्हा अपल्याकडे पुरेसे धान्य, फळे, भाज्या, औषधे असतील तेव्हा कत्तलखाने चालवून गरीब प्राण्यांची हत्या करण्याची काय आवश्यकता आहे? खाण्यासाठी पुरेसे अन्नधान्य, फळे-भाज्या असल्यावर मनुष्याला प्राणी मारण्याची आवश्यकता नाही. नद्यांच्या पाण्यामुळे शेती पिकते आणि त्यातून गरजेपेक्षा अधिक

''येथे केलेल्या द्वारकेच्या वैभवाच्या वर्णनावरून आपणास दिसून येते की, द्वारका नगरी फुलबागा, फळबागा तसेच विपुल कमळांनी शोभायमान असलेल्या जलाशयांनी वेढलेली होती. विशेष म्हणजे या ठिकाणी गिरण्या, कारखाने, आणि जोडीला कत्तलखाने यांचा कुठेच उल्लेख नाही, ज्याच्या धर्तीवरच आजचा आधुनिक मानव समाज आधारित आहे. या आधुनिक सुधारणांचे अग्रणी आपल्या निवासासाठी अशा जागा निवडतात की, तेथे निसर्गाचे सृष्टिसौंदर्य आणि जलाशय सानिध्यात असतील; पण सामान्य माणसाला दाटीगर्दीच्या चाळीत राहण्यासाठी त्यांनी सोडून दिलेले असते, तेथे मैदाने आणि बागा नसतात. या ठिकाणी आपल्याला द्वारकेचे मात्र निराळेच चित्र दिसते. येथे असे

**दुर्दैववश, या आधुनिक संस्कृतीत लोक दही, दूध, तुपाचे पुरविठा करणाऱ्या गाईंची हत्या करण्यात गुंतले आहे.**

अन्नधान्य प्राप्त होते. खनिजे डोंगरांतून मिळतात आणि रत्ने समुद्रातून मिळतात. अशाप्रकारे मानव संस्कृतीला जर पुरेसे धान्य, खनिजे, रत्ने, पाणी, दूध वगैरे असेल तर काही दुर्दैवी माणसांना कष्टांचा बुर्दंड देऊन मनुष्याने अशा भयंकर औद्योगिक उपक्रमांसाठी का लालायित असावे?'' (श्रीमद्‌भागवत १.८.४०)

''मानवी समाजाची प्रगती औद्योगिक प्रकल्पांवर आधारित नसून ती नैसर्गिक साधनसंपत्तीच्या आणि अन्नधान्याच्या संग्रहावर अवलंबून असते, कारण अशी संपत्ती आणि अन्नधान्ये भगवंतांकडून पुरविली जातात, जेणेकरून आपण आपला बहुमूल्य वेळ आत्मसाक्षात्कारासाठी आणि मानवी देहाचे ध्येय यशस्वी करण्यासाठी वाचवू शकू.'' (श्रीमद्‌भागवत ४.९.६२)

कळते की, सर्व धामच अशा बागा आणि क्रीडामैदाने यांनी वेढलेले होते. तसेच तेथे कमलयुक्त जलाशयही होते. असे कळते की, सर्व मंडळी उपजीविकेसाठी निसर्गाने दिलेल्या फुलांफळांवर अवलंबून राहात होती. घृणित झोपड्या आणि गलिच्छ वस्त्या निर्माण करणाऱ्या औद्योगिक उपक्रमावर ते अवलंबून नव्हते.'' (श्रीमद्‌भागवत १.११.१२)

## आसुरी संस्कृती

''धान्य, फळे, भाज्या तसेच रत्ने आणि खनिजे यांचे डोंगर, मोत्यांनी भरलेले समुद्र भगवंतांच्या आज्ञेने उपलब्ध होतात. त्यांच्याच इच्छेवरून भौतिक प्रकृती त्या विपुलतेने उत्पन्न करते किंवा कधी कधी कमी उपलब्ध देखील करते. निसर्गाने दिलेल्या या ईश्वरी देणग्यांचा लाभ मानवाने घ्यावा हा निसर्गाचा कायदाच आहे. आणि भौतिक प्रकृतीवर अधिकार

गाजविण्याच्या गैरहेतूने भारावून न जाता समाधानाने त्यावर भरभराट करावी. भौतिक प्रकृतीच्या आपल्या उच्छृंखल भोग प्रवृत्तीमुळे जितका अधिक गैरफायदा घेण्याचा आपण प्रयत्न करू तितके आपण अशा प्रयत्नांच्या प्रतिक्रियांमध्ये अधिकाधिक गुंतून पडू. अशा नैसर्गिक देणग्या या सर्वस्वी भगवंतांच्या कृपेवर अवलंबन आहेत. म्हणून भगवंतांच्या आज्ञेत राहावे आणि प्रेममय सेवेद्वारा मनुष्य जीवनाचे सार्थक करून घ्यावे.'' (श्रीमद्‌भागवत १.८.४०)

''प्रत्येकजण भगवंतांच्या भौतिक प्रकृतीच्या अधिपत्याखाली आहे, त्यामुळे एखाद्या मूर्खालाच भगवंतांनी परिपूर्णपणे बनविलेल्या या सृष्टीत सुधारणा करण्याची गरज वाटेल.'' (श्रीमद्‌भागवत ७.१४.७)

''संस्कृती आणि दिव्य ज्ञानाचा अभाव असणाऱ्या आसुरी समाजव्यवस्थेने निर्माण केलेल्या मोठमोठ्या इमारती, गाड्या आणि वाहतुकीची वर्दळ असणारे राजमार्गावर समाजातील लोकांची भरभरात निर्भर नसते. निसर्गाद्वारे भगवंत पुरवित असलेल्या वस्तू आपल्या उदरनिर्वाहासाठी पुरेसे आहे.'' (श्रीमद्‌भागवत ५.१६.२४)

''शेतीविषयक उपक्रम राबवून प्रचूर मात्रेत अन्न-धान्य उगविता येते आणि गोरक्षेद्वारा पुरेशा दही, दूध, तुपाची व्यवस्था करता येते. वनांचे रक्षण करून पुरेसे मधदेखील जमा करता येते.''

''दुर्दैववश, या आधुनिक संस्कृतीत लोक दही, दूध, तुपाचे पुरविठा करणाऱ्या गाईंची हत्या करण्यात गुंतले आहे. मध देणारे वृक्ष ते तोडून टाकत आहेत. आणि, जमीनचा उपयोग शेतीसाठी न करता तेथे नट, बोल्ट, गाड्या आणि दारूची निर्मिती करण्यासाठी अवाढव्य कारखाने उभारत आहेत. अशा स्थितीत लोक कसे काय सुखी-समाधानी राहू शकतात? अशा भौतिकवादामुळे ते निश्चितच दु:खी होणार. वृधत्व येण्यापूर्वीच त्यांच्या त्वचेवर वळ्या पडण्यास सुरुवात होऊन त्यांचे शरीर कमकुवत

होत आहे. अभद्र वस्तूंचे भक्षण केल्याने त्यांच्या शरीरातून घामाचा घाणेरडा दर्प येत राहतो. याला काही मानव समाज म्हणता येणार नाही.'' (श्रीमद्‌भागवत ५.१६.२५)

## जीवनातील उच्च ध्येय

''मानवी अंत:करणातील तरल सहृदय भावनांचा विनाश करणाऱ्या गिरण्या आणि कारखाने यांची संख्या किती वाढली हे काही संस्कृतीच्या विकासाचे मोजमाप नव्हे, तर मानवी अंत:करणातील सुप्त आध्यात्मिक चेतना जागृत करून त्याला परमेश्वराजवळ जाण्याची संधी देणे, हे खऱ्या संस्कृतीचे लक्षण आहे.'' (श्रीमद्‌भागवत १.११.१२)

''आपल्या उदरनिर्वाहासाठी आवश्यक साधनांची आधीच निसर्गामध्ये तरतूद करण्यात आली आहे. भगवंतांनी हत्ती तसेच मुंगीसाठीही अन्नाची व्यवस्था करून ठेवली आहे. म्हणून बुद्धिमान मनुष्याने भौतिक आरामदायी जीवनासाठी काबाडकष्ट करू नयेत. उलट, त्याने आपल्या मनुष्य जीवनातील शक्तीचा उपयोग कृष्णभावनेत प्रगतीसाठी करावा.'' (श्रीमद्‌भागवत ७.१४.१४)

''आसुरी प्रवृत्तीचे लोक असे काही औद्योगिक उपक्रम राबवितात की, त्यामध्ये ते सामान्य लोकांना कुत्री, मांजर, डुक्करांसारखे कष्ट करायला लावतात. परंतु, भक्त कृष्णभावनेच्या प्रचाराद्वारे लोकांना साध्या राहणीमानात समाधानी राहून आध्यात्मिक जीवनात प्रगती करण्यास शिकवितात.'' (श्रीमद्‌भागवत ९.२४.५९)

''प्राकृतिक साधनांवर अधिकार सांगणे हेच मनुष्य समाजाचे दूषित ध्येय आहे आणि त्यामुळे मानव समाज दु:ख भोगत आहे. मानव समाज इंद्रियतृप्तीसाठी अविकसित प्राकृतिक साधनांचे जितके अधिक शोषण करील तितका अधिक तो भगवंतांच्या मायावी बहिरंगा शक्तीमध्ये गुंतला जाईल आणि जगाचे दु:ख कमी होण्याऐवजी अधिक तीव्र होईल.'' (श्रीमद्‌भागवत २.२.३७)



*आजचे भारतीय विदेशी तंत्रज्ञानाचे अंधानुकरण करताना कारखान्यांमध्ये रात्रंदिवस काबाडकष्ट करीत आहेत.*

''पशूंपेक्षा अनेक प्रकारे अत्यंत श्रेष्ठ असणारी विशेष अशी मानवी शक्ती ही केवळ आत्म-साक्षात्कारासाठीच उपयोगात आणली जावी. परमेश्वराबरोबरचा आपला विस्मृत संबंध पुनर्स्थापित करण्याच्या ध्येयाकडेच मानवी संस्कृतीने प्रगती करावी, कारण ही गोष्ट मनुष्य जीवनाखेरीज अन्य कोणत्याही जीवनात साध्य होऊ शकत नाही. मनुष्याने भौतिक जगाच्या निरर्थकपणाची जाणीव करून घ्यावी, त्यास बदलणारे स्वप्नदृश्य मानावे, जीवनातील दु:खांवर उपाययोजना करण्यासाठी प्रयत्न करावेत. इंद्रियतृप्ती करणे याच उद्देशाने प्रेरित झालेली आणि सभ्यतेचा मुलामा दिलेली संस्कृती म्हणजे भ्रमच आहे आणि अशा संस्कृतीला 'संस्कृती' असे म्हणता येत नाही. मनुष्य अशा भ्रामक कार्यांचा पाठपुरावा करीत असल्याने तो मायेच्या पाशामध्ये गुंतला जातो.'' (श्रीमद्‌भागवत २.२.४)

''मानवी संस्कृतीच्या प्रगतीस 'आसुरी' असे म्हटले जाते आणि तिची परिणती ही युद्ध आणि दुष्काळामध्ये होते. याठिकाणी अध्यात्मवाद्याने मनात स्थिर असावे अशी त्यास स्पष्ट सूचना करण्यात आली आहे. कारण, यामुळे ''साधी राहणी आणि उच्च विचारसरणी' या तत्त्वाचे अनुसरण करण्यात काही अडथळे आले तरी तो आपल्या दृढ निश्चयापासून किंचितही ढळणार नाही.'' (श्रीमद्‌भागवत २.२.३)

''भगवान विष्णूंची आराधना करणे हे संपूर्ण मानव जातीचे प्रमुख कार्य आहे. सध्या मात्र, मनुष्याला भगवद्‌भक्ती हेच मनुष्याचे मुख्य उद्दीष्ट असल्याची विस्मृती झालेली आहे. त्यामुळे भगवान विष्णूंची पूजा करण्याऐवजी ते एखाद्या भौतिक वस्तूची किंवा व्यक्तीची पूजा करण्यात मग्न झाले आहेत.''

*(उर्वरित भाग - पान क्र. ३० वर)*

# (डि)व्हाईन फ्लू

लेखक याठिकाणी अशा रोगाचे वर्णन करतात ज्याद्वारे मनुष्याची भवरोगातून मुक्तता होते.

–रोहिणी तनय दास



प्रतिवर्षी श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सव जगातील सर्वच इस्कॉन मंदिरात तसेच संपूर्ण भारतात इतरही अनेक भक्तांद्वारे साजरा केला जातो. त्या अनुषंगाने १३ आणि १४ ऑगष्ट २००९ रोजी होणाऱ्या श्रीकृष्ण जन्माष्टी महोत्सवाची जय्यत तयारी दोन महिन्याअगोदरपासून इस्कॉन श्रीगोविंद धाम, रावेत (पिंपरी–चिंचवड) या मंदिरात चालू होती. ४० हजाराहून अधिक घरांमध्ये निमंत्रण पत्रिका पोहोचल्या होत्या. २५ हजाराहून अधिक भाविकांच्या सुविधेसाठी उभारण्यात येणारा, पाऊसापासून सुरक्षित असा भव्य पंडाल जवळ जवळ पूर्ण झाला होता. अभिषेक,नाटीका यांची जय्यत तयारी सुरू होती. मंदिराचे सर्व व्यवस्थापक सर्व काही उत्कृष्ट कसे होईल, हे दक्षतेने पाहत होते. पण, सर्वोच्च व्यवस्थापक असणाऱ्या भगवंतांची काही निराळीच इच्छा होती.


स्वाईन फ्लूचा वाढता प्रभाव पाहता नागरीकांनी गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळावे, या राज्य शासनाने केलेल्या आवाहनामुळे मंदिर व्यवस्थापनाने तातडीची बैठक घेऊन महोत्सवातील सर्व कार्यक्रम पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला.

भारतातील कर्नाटक, दिल्ली, पश्चिम बंगाल, ओरिसा, गुजरात, महाराष्ट्र, प्रांतातही स्वाईन फ्लूचे रुग्ण आढळून येत होते. पालक मंत्र्यांच्या आदेशानुसार (पिंपरी–चिंचवडमधील सर्व शाळा, सिनेमागृहे, काही काळासाठी बंद ठेवण्यात आले होते.) सर्व शहर मास्कमय दिसत होते. मास्कमध्ये होणारा काळाबाजार आणि मास्कची विल्हेवाट कशी लावावी, या समस्या आता पुढे उभ्या ठाकल्या होत्या. जनजागृती करण्यासाठी भारत सरकारने विविध माध्यमांतून रोगाची लक्षणे, असे करा – असे करू नका, बाधीत झाल्यास काय उपाययोजना करावी इत्यादी माहिती प्रसारित केली. शिवाय काही तज्ञ प्रतिकार शक्ती वाढावी म्हणून जास्त पाणी पिणे, सकस आहार, गोमूत्र प्राशन आणि प्राणायाम करण्याचा सल्ला देत होते.

स्वाईन फ्लूची बातमी जरी मुखपृष्ठावरून आतल्या पृष्ठावर गेली असली तरी रोगाचा प्रभाव मात्र अद्यापही कायम आहे. उलट दिपावलीमध्ये होणारी वर्दळ आणि इतर काही कारणांमुळे नोव्हेंबर–डिसेंबरपर्यंत हा रोग झपाट्याने वाढल्याची शक्यता तज्ञ डॉक्टरांच्या वर्तुळात वर्तविली जात आहे.

आयुर्वेदिक डॉक्टरांच्या मतानुसार अशा प्रकारच्या महामारी उद्भवतात त्या लोकांच्या वाढत्या पापकर्मांमुळे. कधी डेंग्यू, चिकणगुण्या, तर कधी एड्स, बर्ड फ्लू आणि आता स्वाईन फ्लू. एक गोष्ट मात्र नक्की आहे की सर्वोच्च नियंत्रकाची शक्ती स्वीकारणे आपणास भाग पडते. म्हणून औषधोपचार आणि पूर्व काळजी सोबतच भगवंतांना प्रार्थना करणे, हे ही तितकेच महत्त्वाचे आहे. हाच उद्देश समोर ठेऊन जगासमोर उभे ठाकलेले स्वाईन फ्लूचे संकट भगवंतांनी लवकरात लवकर दूर करावे तसेच स्वाईन फ्लूचा प्रतिकार आणि प्रतिबंध करण्याची शक्ती त्यांनी सर्वांना

प्रदान करावी, अशी प्रार्थना करण्यासाठी इस्कॉन निगडीचे अध्यक्ष, श्रीमान रघुपती दास यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीगोविंद धाम, निगडी या इस्कॉन मंदिरात भागवत पठण आणि हरे कृष्ण महामंत्राच्या कीर्तनाचे आयाजेन करण्यात आले.



इ. स. १९०० साली आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संस्थेचे संस्थापकाचार्य - श्रील प्रभुपाद हे चार वर्षांचे होते. कलकत्ता शहरात सर्वत्र प्लेग नावाच्या महारारीने थैमान घातले होते. दिवसागणिक अनेक लाके मरत आणि शेकडो शहर सोडून जात होते. त्याच काळात एका बाबाजींनी महामारी दूर व्हावी म्हणून संपूर्ण कलकत्ता शहरात हरिनाम संकीर्तन प्रारंभ केले आणि हरिनामाच्या प्रभावाने काही काळातच ही साथ आटोक्यात आली. काही तज्ञांच्या मतानुसार जोराचा पाऊस पडल्यास स्वाईन फ्लूची साथ आटोक्यात येऊ शकते. भगवद्गीतेनुसार यज्ञ केल्याने पाऊस पडतो, *यज्ञाद्भवती पर्ज्यन्यो* आणि भागवतानुसार कलियुगासाठी यज्ञ म्हणजे हरिनाम संकीर्तन होय - *कलौतद् हरिकीर्तनात.* सारांश, आजदेखील सर्वत्र हरिनाम संकीर्तन यज्ञ करणे अत्यंत आवश्यक आहे.

सर्वांना सळो की पळो करून सोडणारा स्वाईन फ्लूच काय तर जन्म, मृत्यू, जरा, व्याधी आणि तीन प्रकारचे क्लेश या सर्व समस्यांवर वैदिक शास्त्राने दिलेला महत्त्वपूर्ण उपाय म्हणजे कृष्णप्रेमाच्या 'डिव्हाईन फ्लूची' लागण होणे होय.

घाबरू नका! बर्ड फ्लू, स्वाईन फ्लू, नंतरचा हा आणखी एक घातकी रोगाचा प्रकार नव्हे, तर कृष्णप्रेमाच्या आनंदात सर्वांना खरे सूख, समाधान आणि शांती देणारी ही जीवाची स्वाभाविक स्थिती आहे. खरे पाहता हा डिव्हाईन (दिव्य) फ्लू होणे, ही जीवनाची खरी परिपूर्णता आहे. म्हणून तर याला दिव्य (डिव्हाईन) म्हटले आहे.

कृष्णप्रेमाच्या डिव्हाईन फ्लूची लागण 'एच एन १६' (holi name 16) - या सोळा शब्दांपासून बनलेल्या हरे कृष्ण महामंत्ररूपी विषाणूंपासून होते. हा महामंत्र असा आहे - हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण हरे हरे। हरे

*श्रील प्रभुपादांनी संपूर्ण जगतात हरिनामाच्या महिमेचा प्रचार करून सर्वांना कृष्णप्रेमाची लागण लावली आहे.*

राम हरे राम राम राम हरे हरे।। हे हरिनामरूपी विषाणू शुद्ध भक्ताच्या किंवा प्रमाणित गुरुशिष्य परंपरेतील आध्यात्मिक गुरूंच्या मूखातून शिष्याच्या कानाद्वारे त्याच्या हृदयात प्रवेश करतात आणि या शिष्याद्वारे पुन्हा याचा सर्वत्र प्रसार होतो.

उदाहरणादाखल- मी निगडी इस्कॉन मंदिरातील जन्माष्टमी महोत्सवाचा कार्यक्रम स्थगीत होण्याचे जाहीर होण्यापूर्वीच बुलढाण्याला माझ्याला बहिणीला फोन केला – ''पुण्यात स्वाईन फ्लूची लागण झपाट्याने वाढत आहे. तुम्ही कार्यक्रमास येऊ नका.'' ताई म्हणाली, ''ठीक आहे. पुण्यातील स्वाईन फ्लूचे वाढते प्रस्थ पाहता तुझ्या भावोजींची देखील हीच इच्छा होती.''

लागण भावोजींनी अशीच कायम ठेवली तर त्यांच्या आनंदात उत्तरोत्तर वृद्धी तर होईलच आणि त्यांच्या संगात येणाऱ्या इतरांनाही त्याचा संसर्ग होईल, जेणेकरून दुःख, चिंता, तनाव इत्यादी अनेक समस्यांतून त्यांची कायमची सुटका होईल. यामुळे अनेकांना भगवद्‌चरणांचा आश्रय घेण्यास सहाय्य होइल आणि त्यांना तसेच इतरांनाही कृष्णप्रेमाचा डिव्हाईन फ्लू म्हणजेच दिव्य कृष्णप्रेम प्राप्त होईल. या प्रेमाच्या अभावाने पाण्याबाहेर मासा तडफडतो त्याप्रमाणे भौतिक जगातील प्रत्येक जीव तडफडतो आहे. आणि हे प्रेम प्राप्त करणे हा सर्व जीवांचा मुख्य उद्देश आहे.

इतिहासात याची अनेक उदाहरणे आपणास

**कृष्णप्रेमाच्या डिव्हाईन फ्लूची लागण 'एच एन १६' (holi name 16) - या सोळा शब्दांपासून बनलेल्या हरे कृष्ण महामंत्ररूपी विषाणूंपासून होते.**

माझा हरे कृष्ण संस्थेत पूर्णवेळ प्रवेश आणि माझ्यामुळे माझ्या बहिणीने सुरू केलेला हरे कृष्ण महामंत्राचा सोळा माळा जप यामुळे आम्हा दोघांनाही नेहमी चेष्टेने चिडविणाऱ्या, माध्यमिक शाळेत शिक्षकाचा पेशा असणाऱ्या भावोजींविषयी ताई पुढे सांगू लागली, ''तुझे भावोजी आता रोज न चुकता एक माळ हरे कृष्ण महामंत्राचा जप करतात आणि त्यांना श्रील प्रभुपाद प्रणती आणि पंचतत्त्व मंत्र देखील पाठ झाला आहे.'' ताई आनंद आणि आश्चर्याने पुढे बोलत राहिली, ''आज तर आश्चर्य घडले! सकाळी लवकर शाळा असूनही त्यांनी लवकर स्नान करून हातात जपमाळ घेतली आणि हरे कृष्ण मंत्राचा जप करीत ते आनंदाने नाचू लागले आणि 'मला लागण लागली, मला लागण लागली' असे म्हणत नृत्य करू लागले.''

दिव्य आनंदाची सदैव वृद्धी करणारी ही

पहावयास मिळतात. नारदांकडून संसर्ग झालेल्या वाल्या कोळ्याने वाल्मिकी ऋषी बनून २४ हजार श्लोकांचे रामायण महाकाव्याची रचना केली.

या दिव्य कृष्णप्रेमरूपी रोगाची लागण मेक्सीको, अमेरिकेतून नव्हे तर चक्क गोलोक धामातून झाली आहे, *गोलोकेर प्रेमधन हरिनाम संकीर्तन.* श्रीचैतन्य महाप्रभूंनी स्वत: कलियुगातील मंद-सुमंद जीवांसाठी हे हरिनाम संकीर्तन आणले आहे. *पात्र अपात्र न देखी* – कोण पात्र आहे, कोण पात्र नाही, हे काहीही न पाहता श्रीचैतन्य महाप्रभूंनी सर्वांना याची लागण करविली.

श्रीचैतन्यचरितामृत ग्रंथातील महाप्रकाश लीलेवेळी महाप्रभू चार वर्षाच्या नारायणीस म्हणाले, ''नारायणी, तू 'कृष्ण! कृष्ण!' म्हण'' हे ऐकताच नारायणी कृष्णनाम घेत भावविभोर झाली. तिच्या नेत्रांतून प्रेमाश्रू वाहू लागले. शरीरावर रोमांच उभे राहिले आणि कृष्णप्रेमाचे दिव्य भाव ती प्रकट करू लागली.

नवाब हुसेन शहाच्या दरबारी असणाऱ्या काजीने जेव्हा संकीर्तन करणाऱ्या भक्तांचा मृदंग फोडला, तेव्हा चैतन्य महाप्रभू स्वत: त्याच्या घरी गेले. श्रीचैतन्य महाप्रभूंच्या संगामुळे काजी भक्त बनला आणि त्याने फर्मान काढले की भविष्यात त्याचे कोणीही वंशज कधीच संकीर्तन आंदोलनास विरोध करणार नाहीत.

श्रीचैतन्य महाप्रभू जेथे जेथे जात तेथे एखाद्या व्यक्तीस स्पर्श करताच तो कृष्णप्रेमाने वेडा होऊन जाई आणि तो व्यक्ती त्याच्या गावातील इतर व्यक्तीस स्पर्श करी आणि 'कृष्ण! कृष्ण!' म्हणत तो देखील आनंदाने भावविभोर होऊन जात असे. अशा प्रकारे गावच्या गाव कृष्णप्रेमाच्या डिव्हाईन फ्लूची लागण झाल्यामुळे दिव्यानंदाने भारावून जात असत.

चैतन्य महाप्रभूंच्या परंपरेतील दिव्य प्रेमाची लागण झालेले महान आचार्य, ए. सी. भक्तिवेदांत स्वामी श्रील प्रभुपाद यांनी ही लागण १९६५ साली पाश्चात्य जगतात नेली. खिशात केवळ ४० रुपये घेऊन गेलेल्या श्रील प्रभुपादांनी अवघ्या बारा वर्षात १०८ राधा-कृष्ण मंदिरे, कृषीक्षेत्रे, गुरुकूल इत्यादींची स्थापना करून या डिव्हाईन फ्लूची लागण संपूर्ण जगताला दिली. याचाच परिणाम म्हणून संपूर्ण विश्वातील काळे-गोरे, गरीब-श्रीमंत, विविध जाती धर्मातील लोक एका छत्राखाली येऊन खऱ्या अर्थाने जागतिक शांती प्रस्थापित होताना दिसत आहे.


ज्या कोणाला ही दिव्य लागण होऊन जन्म-मृत्यूच्या चक्रातून कायमचे सुटायचे आहे आणि शाश्वत आनंदाची प्राप्ती करायची आहे, त्या सर्वांचे श्रील प्रभुपादांद्वारे स्थापित इस्कॉन मंदिरात सदैव स्वागत आहे. येथे भक्त दिव्य कृष्णनामाचे (एच. एन १६) गायन आणि वितरण करण्याच्या उदात्त कार्यात सदैव मग्न आहेत.

*रोहिणी तनय दास हे निगडी येथील इस्कॉन मंदिरात ब्रह्मचारी आहेत. वरचेवर ते 'जाऊ देवाचिया गावा' मासिकासाठी लेख लिहितात.*

# सुखाच्या शोधात...

खचाखच भरलेला जुगार अड्ड्यात (कॅसिनो) तनाव पसरला होता. अरुणेशने आपले सर्व पैसे डावावर लावले आणि आता तो चिंतीत होऊन आपले ओठ चावत होता.

–दत्त दास



दिवसभर नशिबाने त्याला साथ दिली. आता त्याने जुगारात जिंकलेले सर्व पैसे आणि आपले काका, हरमेश यांच्याकडून उधार घेतलेले पैसे या शेवटच्या डावावर लावले. त्याच्यासाठी जिंकणे म्हणजे उधार घेतलेली रक्कम परत करणे आणि त्याचे घर कर्जदारांच्या हातातून वाचणार होते. हारणे म्हणजे त्याची संपूर्ण समाजात अब्रू जाणार होती.

गोल–गोल फिरणाऱ्या त्या चक्राच्या चारी बाजूला गर्दी जमली होती. लाल आणि काळे पट्टे असणाऱ्या चक्रामध्ये वेगाने फिरणाऱ्या गोळीवर सगळ्यांची नजर खिळली होती.

जसजसे चक्राची गती हळू झाली तेव्हा गोळी टप्पे खात कधी लाल तर कधी काळ्या रंगावर थांबत होती. आणखी गती हळू झाल्यावर ती गोळी अधिक काळासाठी एखाद्या विशिष्ट रंगावर थांबू लागली. काळा, नंतर लाल, नंतर एका सेकंदासाठी काळा, नंतर पुन्हा लाल.

चक्राचे नियंत्रण करणाऱ्याचा अदृश्य हात टेबलाखालील एका बटनाकडे वळाला. गोळी लाल रंगावर येऊन थांबली.

अरुणेशने हृदयात अवर्णनीय रोमांच आणि डोक्यामध्ये आनंदामुळे हलकेपणाचा अनुभव केला.

परंतु, चक्र फिरविणाऱ्या चतुराईने पुन्हा ते बटन दाबले. टेबलाखालील त्या बटनाने पुन्हा चक्र थोडेसे फिरले आणि गोळीने पुन्हा एक टप्पा घेतला. यावेळी गोळी काळ्या रंगावर येऊन स्थिर झाली.

अरुणेशला झटकाच बसला. त्याच्या डोळ्यात अश्रू जमा झाले – ''अरे! मी जवळजवळ डाव जिंकलाच होता; परंतु, आता मी कंगाल झालो आहे.''

या काल्पनिक कथेसमान या जगात शाश्वत सुख प्राप्त करणे लपंडावाच्या खेळाप्रमाणे आहे. यामध्ये अंतत: पराजय निश्चित आहे. भौतिक स्तरावरील सुखाच्या योजनेत निम्नलिखित चार गोष्टींपैकी एक गोष्ट आवश्य असणार.

पहिली म्हणजे आपण योजना बनवितो, त्यावर कार्य करतो आणि लक्ष्याची प्राप्ती करतो – परंतु, अंतत: लक्षात येते की ते लक्ष्य आपल्याला सुख प्रदान करू शकले नाही. आपण विचार करतो की नवीन मोटारगाडी आपल्याला सुखी बनवेल; परंतु, तिच्यावरील दैनंदिन खर्च आपल्याला बोजड बनतो. प्रसिद्ध चित्रपट पहायला जातो; पण, कसेबसे आपण चित्रपटगृहात वेळ काढतो. आपल्या स्वप्नातली राणी अथवा राजाला प्राप्त केल्यानंतर आपल्याला जाणीव होते की एकटे असतानाच आपण अधिक सुखी होतो.

दुसरी गोष्ट असू शकते की, जरी आपण सुखी बनविणाऱ्या लक्ष्यप्राप्तीसाठी कठोर परिश्रम घेतो, तरीदेखील आपल्याला ती लक्ष्यप्राप्ती होत नाही. सुंदर वातावरणात घर घेण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आवश्यक धन जमा करू शकत नाही. कठोर परिश्रम घेऊन आपण प्रसिद्ध संगितज्ञ बनत नाही. संपूर्ण आयुष्य काम करूनही वृद्धावस्थेत चेअरमन पदाची खूर्ची आपल्यापासून एक पाऊल दूरच राहते.

तिसरी गोष्ट अशी असू शकते की, ज्या वस्तूने एके काळी सुख दिले असते ती आता तितकीच सुख देणारी वाटत नाही. नवीन गाडीचा आनंद दोन आठवड्यानंतर आपोआपच विरून जातो. व्हिडीओ गेम सुरुवातीला मजेदार वाटतो, नंतर तासन्तास टिव्ही स्क्रिन पाहात राहणे कंटाळवाणे वाटू लागते.

यदाकदाचित् आपण नशिबाने पहिल्या तीन गोष्टींपासून वाचलात तर चौथी आपली वाटच पाहात असते. आपण थोडे सुख प्राप्त करतो आणि नंतर ते आपल्यापासून दूर जाते. आपल्या स्वप्नांची राणी दुसऱ्या कोणाबरोबर पळून जाते. आपली नोकरीतून हाकालपट्टी केली जाते. मोटारगाडीचा वीमा संपतो बरोबर त्याच दिवशी गाडीची चोरी होते.

भौतिक जगत उतार-चढावांनी भरले आहे. आपल्याला क्षणिक सुख प्राप्त होऊ शकते; परंतु, ते दीर्घकाळ आपल्याबरोबर टिकू शकत नाही. समजा, जीवनभर सुख प्रदान करणारी गोष्ट प्राप्त जरी झाली तरी मृत्यूसमयी आपणास तिला जबरदस्तीने सोडावे लागेल.

हा दृष्टीकोण आपणास निराशावादी वाटतो? टिव्ही विकणाऱ्या दुकानात वडापाव मिळणार नाही, हे ऐकल्यावर त्यात निराशाजनक असे काय आहे. एखाद्या दुकानात विशिष्ट गोष्ट नसेल, तर ती तेथे कधीच मिळणार नाही. आपण म्हणू शकता – ''जोपर्यंत वस्तू सुख देते त्याची मजा घ्या. नंतर ती निघून जाईल तेव्हा तिचे स्मरण करण्यात मजा घ्या.'' परंतु, आठवणी इतक्या सुखदायक असतील तर लोक पुन्हा सुखप्राप्तीसाठी इतर गोष्टींमागे धावू लागतात?

खरे सुख हे केवळ आध्यात्मिक स्तरावरच प्राप्त होऊ शकते. स्वभावत: आपण सत्, चित्, आनंदाने पूर्ण आहोत. त्यामुळे सुखी बनण्याची आपली इच्छा स्वाभाविक आहे. परंतु, आपण शाश्वत (सत्) असल्याने आपणास असे सुख हवे जे शाश्वत, अर्थात कधीच न संपणारे असेल. यासाठी आपल्या आध्यात्मिक सुखाचा शोध घेतला पाहिजे, जे अनंत, असिमीत आणि पूर्ण आनंद प्रदान करणारे आहे.

आध्यात्मिक सुख आध्यात्मिक स्तरावर कार्य करताच आपोआप प्राप्त होते. आपले शरीर एके दिवशी कार्य करणे थांबवेल; परंतु, आपली खरी ओळख असलेला 'आत्मा' कधीच मरत नाही. आपणा सर्वांचा आनंदाचे स्रोत असणाऱ्या भगवान श्रीकृष्णांबरोबर शाश्वत आणि प्रेममय संबंध आहे; परंतु, सध्या या संबंधाची आपणास विस्मृती झाली आहे. हा संबंध पुन्हा जागृत करून आपण शाश्वत काळासाठी सुख आणि संतुष्टी प्राप्त करू शकतो.

• • •

*(पान क्र. २५ वरून)*

''आधुनिक समाज निर्देशित करतो, त्यानुसार मनुष्याला वाटते की, विविध भौतिक वस्तूंच्या संयोगातून उंच गगनचुंबी इमारती बाधणे, मोठमोठे रस्ते, गाड्या इत्यादींची निर्मिती करणे हेच प्रगतीचे लक्षण आहे. अशी संस्कृती ही निश्चितच भोगवादी संस्कृती म्हणून संबोधली जाते, कारण तेथे लोकांना जीवनाच्या प्रमुख उद्दीष्टांविषयी मुळीच रुची नसते.''

''भगवान विष्णूंची प्राप्ती हेच मनुष्य जीवनाचे प्रमुख कार्य आहे. पण, याऐवजी लोक भौतिक प्रकृतीच्या मायावी प्रलोभनांकडे आकर्षित होत आहेत. त्यामुळे भौतिक क्षेत्रातील प्रगती ही दिशाहीन असून त्यांना प्रेरणा देणारे नेतादेखील अंधच आहेत. ते सामान्य लोकांची दिशाभूल करीत आहेत.'' (श्रीमद्भागवत ५.१.१४)

''कृत्रिम गरजांद्वारे जीवन कधीच सुखी होऊ शकत नाही, केवळ 'साधी राहणी उच्च विचारसरणी' या धोरणानुसार जीवन जगल्यावरच मनुष्य खऱ्या प्रकारे सुखी होऊ शकेल.'' (श्रीमद्भागवत २.२.३७)

## अंध आणि पंगू व्यक्तींमधील सहकार्य

''सध्या, भारताची तुलना एका पंगू व्यक्तीशी तर पाश्चिमात्य देशांची तुलना एका अंध व्यक्तीशी करता येईल. मागील दोन हजार वर्षे भारत विदेशांच्या अधिपत्याखाली होता,

# आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघाची महाराष्ट्रातील केंद्रे

## संस्थापकाचार्य : कृष्णकृपाश्रीमूर्ती ए.सी. भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद

- **अमरावती :** श्री श्री रुक्मिणी द्वारकाधीश मंदिर, सरस्वती कॉलनी, राठी नगर, अमरावती.दूरध्वनी :(०२७१) २६६६८४९, ९४२३१२७८४५
- **आरवडे :**– श्री श्री राधा-गोपाल मंदिर, हरे कृष्ण ग्राम, ता. तासगाव, जि. सांगली. दूरध्वनी : (०२३४६) २५५५१५ /२५५७६६, ९३७११६३९५५
- **बीड :** श्री श्री राधा गोविंदजी मंदिर, सावतामाळी चौक - ४३११२२. दूरध्वनी : (०२४४२) २३१७९९, २३३०५४, ९३२५१६४७१३
- **नागपूर :** श्री श्री राधा गोपीनाथ मंदिर, भारतवाडा रोड, गुलमोहर नगर जवळ, रामानुज नगर, कलामन,नागपूर-८; दूरध्वनी : (०७१२)६९९४७३०, ९३७०१५६३८
- **निगडी:** 'श्री गोविंद धाम', आकुर्डी रेल्वे स्थानकानजीक, सर्वे नं.१८९/ ३ बी, सेक्टर २९ प्राधिकरण, रावेत, ता. हवेली, जि. पुणे. दर गुरुवारी सायं. ६ वा. दूरध्वनी : (०२०) ६५३०१८३६
- **पंढरपूर :** श्री श्री राधा पंढरीनाथ मंदिर, हरे कृष्ण धाम, चंद्रभागा नदीच्या पूर्व तीरावर; जिल्हा सोलापूर, ४१३ ३०४. दूरध्वनी : (०२१८६) २६७२४२, २६७२६६, ९४२३३३५९९१
- **पुणे :** श्री श्री राधा कुंजबिहारी मंदिर, ४ तारापूर रोड, कँप, पुणे ४११ ००१ दूरध्वनी: (०२०)४१०३३२२२, ४१०३३२२३
- **मुंबई :** हरे कृष्ण धाम, जुहू ४०० ०४९, दूरध्वनी: (०२२) २६२० ६८६०.
- **मुंबई :** श्री श्री राधा गोपीनाथ मंदिर, के.एम. मुन्शी मार्ग, चौपाटी, मुबई ४०० ००७ , दूरध्वनी: (०२२) २३६६ ५५००, २३६९ ७२२८
- **मीरा रोड :** श्री श्री राधा गिरीधारी मंदिर, हरे कृष्ण धाम, मीरा रोड (पूर्व) जिल्हा ठाणे, दूरध्वनी: (०२२) २८१९०२९१

### *महाराष्ट्रातील इतर साप्ताहिक सत्संग कार्यक्रम

- **अलिबाग :** हरे कृष्ण नामहट केंद्रे, श्री श्री विठ्ठलरुक्मिणी मंदिर, (संत गोरा कुंभार) रामनाथ, अलिबाग.दूरध्वनी :(०२१४१)२२०००५, ९४२३०९१०८१
- **अहमदनगर :**– 'वृंदावन'अहिल्या नगरी, पाईप लाईन रोड नगर, दर शनिवारी, सायं.७.०० वा. दूरध्वनी : (०२४१) २४२७७८५
- **औरंगाबाद :**–१९,राधा मोहन कॉलनी,खोकडपुरा. मोबाईल : ९३२६२००९१४. दर सोमवारी आणि मंगळवारी, सायं. ७ वा. दूरध्वनी: (०२४०)५६१९६५३.
- **कोल्हापूर :** हरे कृष्ण केंद्र, हरी ॐ नगर, शालिनी स्टुडीओ समोर, रंकाळा. दर रविवारी सायं. ४ ते ७. दूरध्वनी : (०२३१) २३२४५६१, ३२९२४३०
- **कोरेगाव :** हेम चेंबर्स, झांजुर्णे ट्रान्सपोर्ट समोर, मेन रोड. दर गुरुवारी सायं. ६.३० वा. दूरध्वनी: (०२१६३) २२१०६४, ९८९०३२३२०१, २२०५४१
- **चाकण :**–जुने विष्णू मंदिर, मेन रोड, दर गुरुवारी सायंकाळी ७ ते ९ दूरध्वनी : (०२१३५) २५६१०४
- **चामोर्शी :** श्री श्री राधा-श्यामसुंदर मंदिर, ७८, कृष्णनगर, चामोर्शी, जि. गडचिरोली – २६४४०३. दुरध्वनी : ९४२३४२२९१४
- **तासगाव :** विठ्ठल मंदिर, महाकाली मंदिराजवळ, कवठे महानकाल (दर बुधवारी सायं. ६.३० वा.) दुरध्वनी : (०२३४१)२२२१२३.
- **दापोली :** राधा-कृष्ण मंदिरासमोर. दर शनिवारी सायं. ६ वा. दूरध्वनी: (०२३५८) २८२१४९ – (श्री. विश्वास फाटक.)
- **नासिक :** जनरल वैद्य नगर, वृंदावन कॉलनी, पूर्णिमा बस स्टॉपच्या पाठीमागे, द्वारका, नासिक - ४२२०११. दूरध्वनी - (०२५३) ६४५०००५, ९८५००७१२२७
- **नांदेड :** भूरेवाड बिल्डिंग, वरचा मजला, इतवारा मारुती चौकाजवळ, दर रविवारी सायं. ४ ते ७ वा. दूरध्वनी : (०२४६२) २५०४१०, ९३२५४४४७२३
- **जुन्नर :** श्री श्री राधाब्रजबिहारी मंदिर, मु. पो. खानगाव, जि. पुणे दूरध्वनी : (०२१३२) २८०४४१/ २८०४४२.
- **परभणी :** श्री. ए. जी. लोखंडे, शिवराम नगर, दर गुरुवारी सायं. ७ ते ९ वा. भ्रमणध्वनी : ९८२३२०२३९२.
- **पालघर :** श्री श्री गौर-निताई आश्रम, आर्यन् हायस्कूल जवळ, मिडलक्लास सोसायटी, जि. ठाणे. दर शनिवारी सायं. ६ ते ९. दूरध्वनी(०२५२५)२५११९०.
- **मिरज :** गर्डर विठ्ठल मंदिर, शिवाजी चौक, मंगळवार पेठ (दर शनिवार : संध्या. ६.३० वा.), दूरध्वनी : (०२३३) २२२६२५५/९८२२५२३८२६, दर सोमवारी ७ ते ९ पर्यंत.
- **सावंतवाडी :** नारायण मंदिर, मोती तलावाजवळ, दर शनिवारी सायं. ६ वा. दूरध्वनी: (०२३६३) २७३५०७, ९२४२१७६५८७.
- **सातारा :** शिवम् हॉल, कोटेश्वर मंदिराच्या पाठीमागे, शुक्रवार पेठ, सातारा. दुरध्वनी : ९७६३४९१४७१(०२१६२)२३७४१८( दर शनिवारी संध्या. ६.०० वा.)
- **सांगली :** मुरलीधर मंदिर, मारुती चौक, शिवाजी पुतळ्याजवळ, सांगली. (दर रविवारी सायं. ६.३० वा.) दूरध्वनी : (०२३३)२३२६४५४
- **सोलापूर :** हरे कृष्ण सत्संग भवन, सी-२६/७३, कारनिक नगर पाठीमागे, दूरध्वनी:९३७११७८३९३. दर रविवारी सायं. ६. वा. *(देहुगाव, लोणावळा येथील कार्यक्रमाच्या माहितीसाठी इस्कॉन-निगडी केंद्राशी संपर्क करा.)*
- **गोवा:** श्री सदन बिल्डींग, आय. डी. हॉस्पिटल जवळ, फोंडा तिस्क, फोंडा, गोवा. दूरध्वनी : (०८३२) २३१३१०५ ०९८५००९००३८/९४२२४५३९४२, दर रविवारी दुपारी १२.३० ते ३
- **बेळगाव :** श्री श्री राधा गोकुलानंद मंदिर, शुक्रवार पेठ, टिळकवाडी, कर्नाटक - ५९०००६. दूरध्वनी : (०८३१) २४३६२६७, २४००१०८.
- **रत्नागिरी :**जी. जी. पी. एस्. शाळेचा बेसमेंट हॉल, सिव्हिल हॉस्पिटलजवळ, दूरध्वनी :९४२२३८२६१२, दर रविवारी सायं ६.३० ते ८.३०

त्यामुळे तो औद्योगिक प्रगतीमध्ये आपली पाळेमुळे तितकीशी रोवू न शकल्याने तो या क्षेत्रात पंगू समजला जाऊ शकतो. पाश्चिमात्य देशात तेथील भौतिक ऐश्वर्याच्या झगमगाटीने लोकांचे डोळे अंध झाल्याने त्यांना आध्यात्मिक जीवनाविषयी काहीच माहिती नाही. अंध व्यक्तीप्रमाणे ते सुखाच्या चाचपडत शोध घेत आहेत.''

''पाश्चिमात्य देशातील हा अंध व्यक्ती आणि भारतातील पंगू व्यक्ती एकत्र आले तर भारतातील पंगू व्यक्ती पाश्चिमात्य अंध व्यक्तीच्या साहाय्याने योग्य दिशेने मार्गक्रमण करू शकतो; आणि पाश्चिमात्य अंध व्यक्ती या भारतीय पंगू व्यक्तीच्या डोळ्याद्वारे पाहू शकतो. थोडक्यात, पाश्चिमात्य देशांतील भौतिक प्रगती आणि भारतातील आध्यात्मिक दृष्टी यांची योग्य सांगड घातली गेल्यास संपूर्ण मानव जातीचे कल्याण होईल.'' (श्रीमद्भागवत ४.२५.१५)

''त्यामुळे जो कोणी भगवान श्रीकृष्णांचा या जगाविषयीचा उद्देश जातो, त्याने या कृष्णभावनामृत आंदोलनाचे महत्त्व गंभीरपणे समजून घेतले पाहिजे आणि त्याचा आपल्या जीवनात अवलंब केला पाहिजे. एखाद्याने स्वत:च्या इंद्रियतृप्तीसाठी या भयानक उग्रकर्मांमध्ये सहभागी होऊ नये.'' (श्रीमद्भागवत ९.२४.५९)

# महाभारत ह्न घरात असावे की नाही!

काही वर्षांपूर्वी भारत सरकारने अनेक देशांमध्ये 'भारत उत्सव' साजरे केले होते. या उत्सवांमुळे 'महाभारत' आणि 'रामायण' या प्राचीन भारतीय ग्रंथांविषयी बरीच उत्सुकता जागृत झाली. त्यानंतर भारतीय दूरदर्शनवर 'महाभारत' ही मालिका आल्यावर तर ही उत्सुकता शिगेला पोहोचली. सकाळी नऊ वाजता मालिका सुरू होताच जणू संपूर्ण भारताचे कामकाज ठप्प होत असे. महाभारत ह्न यामधील 'महा' आणि 'भारत' या दोन शब्दांचा असा अर्थ होतो की, या ग्रंथात प्राचीन भारताचा इतिहास सांगितला आहे. हे प्राचीन साम्राज्य संपूर्ण जगभर पसरले होते. यावेळी संपूर्ण पृथ्वीला 'भारत-वर्ष' असे संबोधले जायचे.

जवळ-जवळ एक लाख श्लोक असलेला हा ग्रंथ जागतिक इतिहासातील अग्रगण्य काव्य-ग्रंथ म्हणून मानला जातो. स्वभावाने धार्मिक असलेले पांडव (पांडू राजाचे पुत्र) शंभर कौरवांचा (धृतराष्ट्र राजाचे शंभर पुत्र) युद्धात कसा पराभव करतात, हे या महाकाव्याचे मूळ सूत्र आहे. कौरव पांडवांविरुद्ध कट-कारस्थान करतात. त्यांना सिंहासनापासून वंचित करून त्यांना सरळ वनवासात पाठवतात. वनवास संपवून पांडव परत येतात त्यावेळी कौरव त्यांना काहीही राज्य न देता सरळ युद्ध करण्याचे आवाहन देतात. यामुळे जागतिक इतिहासात कधीही न घडलेले असे युद्ध घडले.

वरवर पाहता महाभारत एक साधारण काव्य प्रतीत होते, कारण ते प्रामुख्याने अशिक्षित जनतेकरिता संकलित केले गेले होते. वेदांत-सुत्रांमध्ये जटिल आणि कठिण भाषेत दिलेले ज्ञान महर्षी वेद-व्यासांनी महाभारतातील राजकीय कट, कारस्थाने, शौर्यकथा आणि नायक-नायिकांच्या प्रेमकथांच्या रूपात सामान्य जनतेसमोर प्रस्तुत केले; परंतु यामुळे महाभारताला एक साधारण कथा-कादंबरीसारखे समजणे साफ सुकीचे आहे. श्रीमद्भागवतात (१.४.२५) सांगितल्याप्रमाणे :- लोकांना जीवनाचे सार्थक करण्यात मदत करण्यासाठी व्यासदेवांनी वेद संकलित करण्यास आरंभ केला. आणि अशाप्रकारे, त्यांनी अशिक्षित लोकांनाही समजेल अशा भाषेत महाभारताची रचना केली.

महाभारत जरी अशिक्षित लोकांकरिता असले तरी तो या ग्रंथाचा दोष असू शकत नाही. विद्वानांनी हा ग्रंथ वाचू नये असा याचा मुळीच अर्थ होत नाही. वेदांमध्ये वर्णन केलेले खोल विषय हे प्रकांड पंडितांनासुद्धा समजावून सांगण्याची आवश्यकता असते; मग साधारण जनतेचे काय सांगावे? योगाभ्यास आणि खडतर तपश्चर्या करून मन आणि इंद्रियांवर ताबा मिळविल्याशिवाय आपण परमसत्य काय आहे ते समजू शकत नाही. वैदिक ज्ञानाचे अंतिम उद्दिष्ट म्हणजे पूर्ण पुरुषोत्तम भगवान श्रीकृष्णांना समजून घेणे होय. परंतु, भगवान श्रीकृष्णांना तत्त्वतः समजून घेणे खूप कठिण आहे. यामुळे व्यासदेवांनी करुणावश होऊन हा ग्रंथ संकलित केला. म्हणूनच श्रील प्रभुपाद एकदा म्हणाले होते की, ''सध्याच्या युगात महाभारत हा ग्रंथ मूळ वेदांपेक्षा अधिक महत्त्वाचा आहे.''

महाभारत कथेचा मूळ उद्देश, वेदांचे तत्त्वज्ञान स्पष्टपणे व्यक्त करणे हा आहे आणि असे असल्यामुळे महाभारतात भगवद्गीतेच्या रूपातील सर्व उपनिषदांचे सार ठेवण्यात आले आहे. श्रील व्यासदेव सर्व वेदशास्त्रांचे मूळ संकलनकर्ता आहेत, तसेच ते भगवान श्रीकृष्णांचे अवतारही आहेत. तेव्हा श्रील व्यासदेव आणि भगवान श्रीकृष्ण हे दोघेही दिव्य व्यक्ती असल्यामुळे त्यांच्या सहकार्यामुळे कलियुगातील जनतेला भगवद्गीतेसारखा अनमोल ग्रंथ प्राप्त झाला आहे.

वेळ कमी, दुःखे जास्त, सर्वत्र अंधकार ह्न अशी आपली आजची परिस्थिती असल्यामुळे व्यासदेवांसारख्या व्यक्तींनी दिलेल्या मार्गदर्शनाचा लाभ घेण्यातच खरी हुशारी आहे. जर जगभर लोकांनी महाभारताकडे नुसते काव्य म्हणून न पाहता त्यातील कृष्णभक्तीचा संदेश आत्सात केला तर जे आज घरोघरी ''महाभारत'' (म्हणजेच भांडण-तंटे) दिसत आहेत ते दिसणार नाही.

*-श्यामानंद दास*